क्रमांक : १२७

महाराष्ट्र विधानसभा

पत्रक भाग दोन

सोमवार, दिनांक १२ सप्टेंबर, २०२२ / भाद्रपद २१, १९४४ (शके)

लक्षवेधी सूचनांवरील प्रलंबित निवेदनांच्या प्रतींचे वितरण

१२७ . सर्व सन्माननीय विधानसभा सदस्यांना कळविण्यात येते की, विधानसभेचे सन २०२२ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन बुधवार, दिनांक १७ ऑगस्ट, २०२२ रोजी विधान भवन, मुंबई येथे सुरु होऊन गुरुवार, दिनांक २५ ऑगस्ट, २०२२ रोजी संस्थगित झाले.

संस्थगित झालेल्या प्रथम सत्रातील एकूण ५७ स्वीकृत लक्षवेधी सूचनांचे जोडपत्र दिनांक २५ ऑगस्ट, २०२२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले. त्यापैकी ६ निवेदने मा.सदस्यांना टपालखणाव्दारे त्याचदिवशी वितरीत करण्यात आली होती व एकूण ५१ लक्षवेधी सूचनांची निवेदने प्रलंबित होती. त्यापैकी १५ लक्षवेधी सूचनांची निवेदने शाखेत प्राप्त झाली असून ती यासोबत वितरीत करण्यात येत आहेत.

विधान भवन,
मुंबई,
दिनांक : १२ सप्टेंबर, २०२२

राजेन्द्र भागवत
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

याची प्रत :

१. महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य.
२. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.
३. संगणक कक्ष (website.)

लक्षवेधी सूचना क्र.१

सन २०२२ चे पावसाळी अधिवेशन

सर्वश्री. लहू कानडे, सुनिल प्रभू, वि.स.स. यांनी विधान सभा नियम १०५ (३) अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १ पुढील प्रमाणे आहे.

"अनुसुचित जातीच्या विद्यार्थ्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या (बार्टी) माध्यमातून दर्जेदार प्रशिक्षण देण्याच्या नावाखाली संस्थेला कोट्यावधीच्या प्रशिक्षण कार्यक्रमाचे कंत्राट देऊन खासगी संस्थाचे प्रशिक्षण कार्यक्रम सामाजिक न्याय विभागासाठी भ्रष्टाचाराचे कुरण बनण्याचा गंभीर प्रकार माहे जुलै, २०२२ मध्ये उघडकीस येणे, बार्टी कडून ३०० विद्यार्थ्यांना दिल्ली येथे "युपीएससीचे प्रशिक्षण दिले जात असतांना बार्टीच्या स्वायत्तेमध्ये सामाजिक न्याय विभागाने परस्पर हस्तक्षेप करून १८० विद्यार्थ्यांच्या प्रशिक्षणाचा शासन निर्णय काढून काही प्रशिक्षण संस्थांना आर्थिक लाभ मिळवून देण्यासाठी स्पर्धापरिक्षा प्रशिक्षण कार्यक्रम राबवित असल्याचे उघडकीस येणे, बार्टीकडून दरवर्षी ३०० विद्यार्थ्यांना दिल्ली येथे "युपीएससी"चे प्रशिक्षण दिले जात असतांना सामाजिक न्याय विभागाने दि. २७ जून रोजी विद्यार्थी हिताचा दाखला देत शासन निर्णय काढून राज्यातील ६ महसूल विभागातील नामवंत शिकवणी संस्थेमार्फत १८० विद्यार्थ्यांना "युपीएससी" पुर्व तयारीच्या अनिवासी प्रशिक्षणासाठी मान्यता देणे, बार्टीच्या नियामक मंडळाच्या बैठकीत निर्णय घेण्यात आल्याचा संदर्भ देण्यात येणे, परंतू बार्टीकडून आदीच ३०० विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिली जात असतांना पुन्हा एकदा अन्य संस्थांची निवड करण्यात आल्याने निर्माण झालेले संशयाचे वातावरण शासनाने याप्रकरणी तातडीने या भ्रष्टाचाराची चौकशी करून पारदर्शक कार्यवाही करण्याची आवश्यकता वा प्रतिक्रिया."

-श्री. एकनाथ शिंदे, मा.मुख्यमंत्री यांचे निवेदन-

बार्टी मार्फत अनुसूचित जातीतील युवकांचा स्पर्धा परीक्षेतील यशस्वी होण्याचा टक्का वाढावा यासाठी प्रतिवर्षी युपीएससी परीक्षेचे पूर्व तयारी प्रशिक्षणाकरिता दिल्ली येथे २०० विद्यार्थ्यांना, यशदा पुणे येथे ३० विद्यार्थ्यांना, भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्र (६ केंद्र SIAC) येथे ६० विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात येते. तसेच विद्यार्थ्यांना युपीएससी मुख्य परीक्षा व मुलाखतीकरिता आर्थिक सहाय्य देण्यात येते.

दि.२२ एप्रिल,२०१६ रोजीच्या बार्टी संस्थेच्या नियामक मंडळाच्या १४ व्या बैठकीतील विषय क्र. १४ नुसार महाराष्ट्रातील अनुसूचित जातीतील १८० उमेदवारांना (प्रत्येक महसूल विभागात ३० उमेदवार प्रमाणे) सहा महसूल विभागातील नामवंत कोचिंग संस्थेमार्फत यु.पी.एस.सी. नागरी सेवा परीक्षेच्या पूर्वतयारीचे अनिवासी स्वरूपाचे प्रशिक्षण देण्यासाठी मान्यता प्रदान केली होती. सदर प्रशिक्षणाकरिता संस्था निवडीसाठी प्रसिध्द केलेल्या ई-निविदा क्र. २२५ मधून नागपूर, अमरावती, नाशिक व औरंगाबाद विभागातून संस्थांची निवड केली होती. तथापि निविदा क्र. २२५ करिता पुणे व मुंबई विभागातील प्रशिक्षण संस्थांनी प्रतिसाद दिला नसल्याने, पुणे व मुंबई महसूल विभागाकरिता पुन्हा

या दोन्ही ई- निविदांमार्फत संस्थांची निवड प्रशिक्षण शुल्क व महसूल विभाग याबाबतचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	महसूल विभाग	संस्थेचे नाव	प्रशिक्षण शुल्क प्रति विद्यार्थी	प्रायोजित विद्यार्थी
१	पुणे	UPSC Academia, Pune	१,३४,०००/-	३०
२	मुंबई	Spectrum Academy, Thane	१,२०,०००/-	३०
३	नाशिक	Spectrum Academy, Nashik	१,२०,०००/-	३०
४	औरंगाबाद	Spectrum Academy, Aurangabad	१,२०,०००/-	३०
५	अमरावती	Shri Shetkari Shikshan Sanstha,Amravati	८४,०००/-	३०
६	नागपूर	Sidharth Gautam Shikshan Samiti, Nagpur	१,१०,०००/-	१५
		Premier Academy Society, Nagpur	१,१५,०००/-	१५

उपरोक्त तक्त्यात नमूद सात संस्थांची निवड सन २०१७-१८ या एक वर्षांच्या कालावधीतील प्रशिक्षणाकरिता करण्यात आली होती. वर्ष २०२०-२१ व २०२१-२२ या वर्षी कोविड १९ च्या प्रादुर्भावामुळे ई-निविदा प्रक्रिया करणे शक्य नव्हते. तसेच संस्थांसोबत केलेल्या करारनाम्यानुसार, 'सदर करारनामा (MOU) १ वर्षाकरिता वैध राहील, तसेच बार्टी व प्रशिक्षण संस्थेच्या सहमतीने करारनाम्यास मुदतवाढ देण्यात येईल असे नमुद आहे. त्यानुषंगाने सदर प्रस्ताव निर्णयास्तव डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) मार्फत शासनाकडे सादर करण्यात आला होता.

त्यानुषंगाने, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्र. बारटी २०२२/प्र.क्र.०५/बांधकामे दि. २७/०६/२०२२ नुसार मागील दोन वर्षांमध्ये युपीएससी नागरी सेवा परीक्षेच्या पूर्व तयारीचे कोणतेही प्रत्यक्ष प्रशिक्षण न झाल्याने तसेच प्रशिक्षणाची मागणी मोठ्या प्रमाणात असल्याने विद्यार्थी हित लक्षात घेता निविदेद्वारे निवडलेल्या, १४ व्या नियामक मंडळाने मान्यता दिलेल्या सहा महसुल विभागातील प्रशिक्षण केंद्राना उर्वरित एका वर्षाकरीता मुदतवाढ देण्यात आलेली आहे. तसेच पुढील वर्षाकरीता ई-निविदा प्रक्रिया राबविण्याचे निर्देश देखील नस्तीवर देण्यात आले आहेत.

सद्यस्थितीत विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये याकरीता ई-निविदा क्र.२४८ मध्ये नमूद Part-४ General terms and condition मधील मुद्दा क्र.२१ नुसार करारनाम्यातील नमूद दराप्रमाणे सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाकरीता मान्य २०० व विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेता अधिकचे १०० असे एकूण ३०० विद्यार्थ्यांना युपीएससी नागरी सेवा परीक्षेचे प्रशिक्षणाकरिता, दिल्ली येथील नामवंत प्रशिक्षण केंद्रामध्ये प्रशिक्षण घेण्याकरीता बार्टीमार्फत आर्थिक सहाय्य करण्यात येत आहे. अशा प्रकारे सद्यस्थितीत एकुण ४८० विद्यार्थ्यांची निवड प्रक्रिया राबविण्यात येत आहे.

याकरिता दि.३१/०७/२०२२ रोजी महाराष्ट्रातील सहा विभागांमध्ये विद्यार्थ्यांची निवड करण्यासाठी प्रवेश चाचणी परीक्षा घेण्यात आली असून विद्यार्थी निवड अंतिम टप्यात आहे.

६.

महाराष्ट्र विधानसभा

नगर विकास विभाग **लक्षवेधी सूचना**

सन २०२२ चे ~~दुसरे~~ (पावसाळी) अधिवेशन

श्रीमती यामिनी यशवंत जाधव, विधानसभा सदस्या यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहेः-

"ठाणे जिल्ह्यातील कल्याण स्थिती रूक्मिणीबाई रूग्णालयाची इमारत पुर्णपणे मोडकळीस येणे, दिनांक ०५ जुलै,२०२२ रोजी रूग्णालयाच्या छताचे प्लास्टर कोसळणे, रूग्णालय इमारत जुनी असल्याने अतिशय धोकादायक झाल्याने प्लास्टर कोसळण्याच्या घटना वारंवार कोसळुन संपूर्ण इमारत अतिशय धोकादायक व गलिच्छ होणे, इमारत दुरूस्तीसाठी नागरीकांनी राज्याच्या आरोग्य मंत्र्यांना पत्र लिहिणे, श्री. भोईर यांनी दिनांक ०६ जुलै,२०२२ रोजी वा त्यासुमारास इमारत दुरूस्तीसाठी मा. मुख्यमंत्री यांना निवेदन सादर करणे, विविधस्तरावर मागणी नोंदवून ही इमारत दुरूस्तीबाबत कोणतीही पावले उचलली न जाणे, त्यामुळे शासनाच्या प्रती आकस निर्माण होउन जनतेत तिव्रस्वरूपाचा असंतोष पसरणे, इमारत कोसळून दुर्घटना होण्यापुर्वी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या, कल्याण पश्चिम भागात बाई रूक्मिणीबाई सामान्य रूग्णालयाची इमारत आहे. सदर इमारतीचे काम सन १९९८ मध्ये पूर्ण झालेले आहे. सदर इमारत आर. सी. सी. तळ अधिक दोन मजल्यांची आहे. सदर रूग्णालयात बाह्यरूग्ण व आंतररूग्ण विभागांतर्गत विविध आजारांशी संबंधित आरोग्यविषयक सेवा पुरविण्यात येतात. सदर इमारतीच्या आवश्यक दुरूस्तीच्या दृष्टीने एप्रिल २०१८ मध्ये मे. ई-स्ट्रक्ट कंन्सल्टन्सी प्रा. लि. या स्ट्रक्चरल कंन्सल्टंट मार्फत सविस्तर स्ट्रक्चरल ऑडीट करण्यात आले होते. त्यांनी दिलेल्या अहवालानुसार सदर इमारत C२-B (No Eviction and requiring Structural Repairs) अशी वर्गवारी देण्यात आलेली आहे.

त्यानुसार सदर इमारत अतिधोकादायक नसून ती खाली करण्याची आवश्यकता नाही व स्ट्रक्चरल देखभाल, दुरूस्ती, मजबुतीकरण व पुनर्वसन कामे वेळोवेळी करण्याची आवश्यकता आहे, असा अभिप्राय दिलेला आहे. सदर अभिप्रायानुसार इमारतीच्या स्ट्रक्चरल दुरूस्तीची कामे करण्यात आलेली आहेत. यात डिसेंबर, २०१९ पासून स्ट्रक्चरल रिपेअर्स, छत व आतील भिंती व बाहेरील बाजूचे सर्व खराब झालेले प्लास्टर काढून ते नवीन करणे, रंगकाम, वॉटर प्रुफींग, टाईल्स बदलणे, प्लंबिंगची कामे, रेनवॉटर पाईप, स्लाईडींग विन्डोची कामे इ. कामे करण्यात आली आहेत. याशिवाय, कोविड काळात ओपीडीसाठी शेड बांधणे, ग्रीन व रेड झोन तयार करणे, नवीन आय.सी.यू. साठी आवश्यक फ्लोरींग व फॉल्स सिलींगची कामे व वॉटर प्रुफींग इ. कामे करण्यात आली आहेत.

दि.०२.०७.२०२२ रोजी सदर रूग्णालयाच्या दुसऱ्या मजल्यावरील पुरूष वॉर्डमधील कोपऱ्या लगत स्लॅबच्या प्लास्टरचा १ चौ.मी. क्षेत्रफळाचा भाग काही प्रमाणात ओलावा असल्यामुळे पडण्याची घटना घडली. सदर इमारतीत आवश्यक दुरूस्तीसाठी इमारतीच्या वॉर्डमधील रूग्णांची इतरत्र व्यवस्था केल्यानंतर ती मोकळी केल्यानंतर दुरूस्तीचे काम करणे शक्य होते. उक्त घटनेनंतर सदर वॉर्ड मोकळा करून देण्यात आल्यानंतर पडलेले प्लास्टर, तसेच, आजूबाजूचा दुरूस्तीसाठी आवश्यक असलेला भाग काढून, दि.१२.०७.२०२२ पूर्वी प्लास्टरची योग्य प्रमाणे दुरूस्ती करण्यात आलेली आहे.

सदर पडलेल्या १ चौ. मी. क्षेत्रफळाच्या भागाचे प्लास्टरचे काम तातडीने करण्यात आलेले आहे. तसेच, इमारतीचे इतर भागातील आवश्यक दुरूस्तीचे कामही वेळावेळी करण्यात आले असून, अद्यापही महानगरपालिकेच्या इमारतीची दुरूस्ती व निगा अंतर्गत विविध कामे सुरू आहेत.

****

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२२ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन

श्री. रविंद्र वायकर, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

"मुंबई उपनगरातील पश्चिम द्रुतगती मार्गावर मोठ्या प्रमाणात होणारी वाहतुक कोंडीचे प्रमाण कमी करण्यासाठी मुख्य रस्त्यास लागून ज्या ठिकाणी सेवा रस्ता उपलब्ध करणे शक्य आहे त्या ठिकाणी सेवा रस्ता प्रस्तावित करण्यात आलेला असणे, पश्चिम द्रुतगती महामार्गावरील ओबेरॉय ते चेकनाका या मार्गावरील सर्वोदयनगर येथे खाजगी ट्रॅव्हल्स कंपन्यांच्या गाड्या बेकायदेशीररित्या उभ्या करण्यात येत असल्याने त्यास बंदी घालुन या ठिकाणी असलेल्या बैठ्या चाळींचे याच परिसरात अन्यत्र पुनर्वसन करुन उक्त सेवा रस्त्याचे काम करण्याबाबत स्थानिक नागरिकांकडुन वारंवार मागणी करण्यात येत असणे, जोगेश्वरी विधानसभा क्षेत्रातील गोरेगाव चेकनाका शिवधाम स्मशानभुमी ते वनराई वसाहत येथील प्रस्तावित करण्यात आलेल्या सेवा रस्त्याचे काम तांत्रिक कारणास्तव तसेच सदरहू प्रस्तावित सेवा रस्त्याच्या वरुन उच्चतम विद्युत प्रवाहाच्या व पर्जन्य जलवाहिन्या असल्याने अद्याप प्रलंबित असणे, सद्य:स्थितीत गोरेगाव चेकनाका येथे भुयारी मार्गाचे काम सुरु असल्याने उक्त नमूद प्रस्तावित सेवा रस्त्याच्या वरील उच्चतम विद्युत प्रवाहाच्या वाहिन्या तसेच भूमिगत पर्जन्य जलवाहिन्या स्थलांतरित करणे सहज शक्य असल्याने त्या दृष्टीने कार्यवाही करण्याबाबत तसेच ईस्माईल युसुफ महाविद्यालय बसथांबा ते पंप हाऊस पर्यंतच्या सेवा रस्त्याचे सद्य:स्थितीत बंद असलेले काम तातडीने सुरु करुन पूर्ण करण्याबाबत तसेच बिंबीसार नगर ते पंपहाऊस या मार्गावरील सेवा रस्त्याचे काम पूर्ण करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. नगरविकास मंत्री, मा. सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री यांना माहे फेब्रुवारी, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान लेखी निवेदन सादर केलेले असणे, तथापि उक्त निवेदनाच्या अनुषंगाने अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात न आल्याने सदरहू मार्गावरील वाहतुक कोंडीमुळे वाहनचालक व नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत असणे, या प्रकरणी शासनाकडे कार्यवाही करण्याबाबत वारंवार विनंती अर्ज सादर करुनही या प्रकरणी कोणतीच कार्यवाही होत नसल्याने स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण होणे, उक्त प्रकरणी तातडीने कार्यवाही करुन गोरेगाव चेकनाका शिवधाम स्मशानभूमी ते वनराई वसाहत येथील प्रस्तावित करण्यात आलेल्या सेवा रस्त्याचे काम तसेच सदरहू प्रस्तावित सेवा रस्त्याच्या खालुन उच्चतम विद्युत प्रवाहाच्या वाहिन्यांचे जाळे व पर्जन्य जलवाहिन्या स्थलांतरीत करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

मा. मुख्यमंत्री यांचे निवेदन

दिंडोशी वाहतूक विभागांतर्गत पश्चिम द्रुतगती महामार्गावरील ओबेरॉय ते चेकनाका या मार्गावरील सर्वोदयनगर येथील सेवा रस्त्यावर बेकायदेशीररित्या उभ्या असणाऱ्या खाजगी ट्रॅव्हल्स कंपन्याच्या वाहनांवर पोलीस वाहतूक विभागाच्या रायडर तसेच अंमलदारांमार्फत नियमित कारवाई करण्यात येत आहे. सन २०२२ मध्ये अशा खाजगी बसेस वर ८५१ कारवाया करण्यात आल्या आहेत.

डी.पी.रोड प्रस्तावित आहे. सर्वोदय नगर येथील बैठ्या चाळी ह्या दिंडोशी गावातील न.भू.क्र.८१ जागेवर असून सदरची जागा दुग्ध विकास आयुक्तालयाच्या मालकीची आहे. सदर डी.पी.रोड चे बांधकाम करताना सर्वोदय नगर येथील बैठ्या चाळींचे पुर्नवसन करणे अपेक्षित असून याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून धोरणात्मक निर्णय घेण्याचे नियोजित आहे.

गोरेगाव चेकनाका येथील गोरेगाव आरे उड्डाणपुलाखालील पादचारी भुयारी मार्गाचे काम मार्ग विकास विभाग क्र.४, अंधेरी यांचेमार्फत करण्यात येत होते. ६१.०० मीटर लांबीच्या भुयारी मार्गापैकी सुमारे ४१.०० मीटर लांबीचे बांधकाम पूर्ण करण्यात आले आहे व महामार्गाच्या उत्तर-दक्षिण वाहिनीच्या कडेवरील आरे कॉलनी बाजूच्या जिन्याचे काम बांधकामाधीन होते. दरम्यानच्या कालावधीत "मार्ग विकास विभाग क्र.४, अंधेरी" हा विभाग एमएमआरडीएकडे हस्तांतरित करण्यात आला असल्याने उर्वरित काम "अधीक्षक अभियंता, मुंबई बांधकाम मंडळ, चेंबूर" यांचे कार्यालयाकडे डिसेंबर, २०२१ मध्ये हस्तांतरित करण्यात आले आहे. सदरचे काम पावसाळा संपल्यानंतर वाहतूक विभागाच्या आवश्यक त्या परवानग्या प्राप्त करून पूर्ण करण्याचे नियोजित आहे.

जोगेश्वरी विधानसभा क्षेत्रातील गोरेगाव चेकनाका शिवधाम स्मशानभूमी ते वनराई वसाहत दरम्यानचा १८.३० मी. रुंदीचा विकास नियोजीत रस्ता बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ताब्यात असून सदर जागेवर सुमारे २५० झाडे तसेच, उच्च दाबाच्या तीन विदयुत पायलॉन स्थित आहेत. सदर जागेवरील झाडे व विदयुत पायलॉन काढण्याबाबत संबंधीत खात्यांशी पाठपुरावा सुरू असून याबाबतची आवश्यक ती कार्यवाही झाल्यानंतर सदर रस्तेबांधणी कामासोबतच पर्जन्य जलवाहिन्यांचे काम प्राधान्याने करण्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून नियोजित आहे.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत के/पूर्व विभागातील इस्माईल युसुफ महाविद्यालय ते पंप हाऊसपर्यंतच्या सेवा रस्त्याच्या कामासाठी दि. ०२.०४.२०१८ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आला होता. तथापि, दरम्यानच्या कालावधीमध्ये मे. ओंकार व्हेंचर प्रा. लि. कंपनी यांनी सन २०१४ ला एस.आर.ए. स्किम अंतर्गत भुखंड विकसित करण्यासाठी बॅरिकेटींगसाठी परवानगी देतेवेळी "कार्यकारी अभियंता, मार्ग विकास विभाग क्र. ४ अंधेरी" यांचेकडून मे. ओंकार व्हेंचर प्रा. लि. कंपनी यांनी स्व: खर्चाने टेकडी भुईसपाट करण्याचे काम पूर्ण झाल्यावर सदर टेकडीखाली असलेला सेवारस्त्याचा भूभाग कोणताही वाद निर्माण न करता अथवा न्यायालयाकडून कोणताही स्थगिती आदेश न घेता सार्वजनिक बांधकाम विभागाकडे हस्तांतरीत करण्याबाबत अट घातली असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे प्राधिकरणाने हाती घेतलले सेवा रस्त्याचे सदरहू काम थांबविण्यात आले. मे. ओंकार व्हेंचर्स प्रा. लि. यांचेकडून सेवा रस्त्याची टेकडी काढून भूभाग सपाट करुन देणे अपेक्षित होते तथापि अद्यापपर्यंत मे. ओंकार व्हेंचर्स प्रा. लि. यांचेकडून कार्यवाही करण्यात आलेली नाही. याबाबत तसेच सदरहू सेवा रस्त्याबाबत एकत्रित निर्णय घेण्याची प्रक्रिया एमएमआरडीएच्या स्तरावर सुरू आहे.

****

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२२ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन

मा. सर्वश्री. श्री.प्रशांत ठाकुर, महेश बालदी, समीर कुणावार, श्रीमती मनिषा चौधरी, श्री.अमित साटम, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

" नवी मुंबई " क्षेत्र विकसीत करताना तसेच पनवेल व उरण तालुक्यात मूलभूत सोयी सुविधा देताना ' पाणी पुरवठा ' अत्यंत मूलभूत प्रश्नाकडे सिडको प्रशासनाचे दुर्लक्ष झालेले असणे, उक्त तालुक्यात पाणी पुरवठा करण्याकरिता सिडको प्रशासनाला नवी मुंबई महापालिका, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, एमआयडीसी या घटकांवर अवलंबून रहावे लागत असणे, सिडको प्रशासनाच्या नियोजन शून्य कारभारामुळे उरण व पनवेल तालुक्यातील नागरिकांना अनेक वर्ष सातत्याने अपुऱ्या व कमी पाणी पुरवठ्याचा सामना करावा लागत असणे, पनवेल, उरण या तालुक्यांमध्येच नवी मुंबई आंतराष्ट्रीय विमानतळ, प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत तयार होणारे गृहनिर्माण प्रकल्प, नैना प्रकल्प इ. प्रकल्पांमुळे वाढती लोकसंख्या पाहता भविष्यात नागरिकांना तीव्र पाणी टंचाईला सामोरे जावे लागणार असणे, उक्त तालुक्यात सद्यस्थितीत अस्तित्वात असलेल्या लोकसंख्येला पाणी पुरवठा करण्यास सिडको प्रशासन असमर्थ ठरत असणे, अपुऱ्या पाणी पुरवठ्यामुळे नागरिकांच्या रोषाला स्थानिक लोकप्रतिनिधींना सातत्याने सामोरे जावे लागत असणे, याबाबत शासनाने उरण व पनवेल तालुक्यातील सिडकोने विकसित केलेल्या प्रकल्पांना सिडकोमार्फत सुरळीत पाणीपुरवठा तातडीने करण्याबाबत करावयाची नितांत आवश्यकता, त्यावर शासनानें त्वरीत करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया"

मा.मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे निवेदन

नवी मुंबई प्रकल्पासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम,१९६६ मधील नियम ११३ अन्वये सिडको महामंडळाची नियोजन प्राधिकरण म्हणुन नियुक्ती करण्यात आल्यानंतर नवी मुंबईतील विविध नोडस मधील गृहप्रकल्पांना पाणीपुरवठा करण्यासाठी एम.आय.डी.सी. च्या बारवी, पाताळगंगा स्त्रोतामधुन तसेच महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाच्या न्हावा शेवा टप्पा १ अंतर्गत व मोरबे पाणीपुरवठा योजनेमध्ये सिडकोने भागभांडवल अदा करून पाण्याचे आरक्षण करण्यात आले होते. तद्नंतर सिडको विभागातील वाढती लोकसंख्या विचारात घेऊन वाढीव पाण्याची पुर्तता करण्यासाठी हेटवणे धरणामधुन सन १९९२ मध्ये पाटबंधारे विभागास भाग भांडवल देऊन १०० दशलक्ष लिटर पाण्याचे आरक्षण करण्यात आले. याशिवाय सिडकोने सन २००९-१० मध्ये बाळगंगा पाणीपुरवठा प्रकल्प राबविण्याचा निर्णय घेतला, परंतु सदर प्रकल्पाची न्यायालयीन बाबींमुळे निर्माण झालेली अनिश्चितता लक्षात घेता हेटवणे प्रकल्पामधून सन २०१६ मध्ये अतिरिक्त ५० दशलक्ष लिटर तर सन २०२० मध्ये १२० दशलक्ष लिटर पाण्याचे आरक्षण मंजुर करण्यात आले आहे.

दरम्यानच्या काळात नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्राधिकरण क्षेत्रामध्ये (नैना) पनवेल, खालापूर, पेण, उरण तालुक्यातील गावांचा समावेश करून या भागातील नियोजन करण्याचे काम

सिडकोकडे सोपविण्यात आले. या क्षेत्रातील पाणीपुरवठयासाठी सिडकोमार्फत कोंढाणे धरण प्रकल्पाचे काम हाती घेण्यात आले असून, या योजनेद्वारे २५० दशलक्ष प्रतिदिन पाणीपुरवठा करण्याचे नियोजन आहे. परंतु सद्यस्थितीत सिडकोच्या विकसित केलेल्या विभागांची वाढती लोकसंख्या विचारात घेता पाणीपुरवठ्याच्या विविध स्त्रोतामधुन सिडको महामंडळाने सन २०२० पर्यंत केलेले पाणी आरक्षण, प्रत्येक विभागांची मागणी व प्रत्यक्ष पाणीपुरवठा विचारात घेता सद्यस्थितीत प्रति दिन ३० दशलक्ष लिटर पाण्याचा तुटवडा भासत होता.

यासर्व बाबींचा विचार करुन सिडको महामंडळाकडून विविध नोडस साठी तातडीच्या, मध्यावधी व दिर्घकालीन उपाययोजना केलेल्या आहेत. सदर उपाययोजनेंतर्गत ज्या विभागामध्ये पाणी पुरवठयात जास्त तूट दिसुन येत आहे अशा विभागामध्ये क्षेत्रनिहाय पाण्याचे वितरण व्यवस्थापन केले आहे, जेणेकरून सर्व नागरिकांना योग्य दाबाने पाणी पुरवठा होईल. याशिवाय हेटवणे सिडको आऊटलेट गेट चे रुपांतर प्रेशर कंड्युटचे काम पुर्ण झाल्याने तसेच महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाच्या न्हावा शेवा टप्पा २ अंतर्गत पंपिंग मशिनरीमध्ये सुधारणा झाल्याने सद्यस्थितीत पाणीपुरवठ्याच्या निकषानुसार प्रति माणसी १३५ लिटर प्रतिदीन पाणीपुरवठा करण्यात येत आहे.

तसेच टाटा कन्सलटंसी कंपनीला खारघर विभागातील नागरिकांना नियमित व योग्य दाबाने पाणी पुरवठा होण्यासाठी जलवाहिनीवरील समतोल तसेच वितरण व्यवस्थेसाठी तांत्रिक लेखापरिक्षक व सल्लागार म्हणुन नियुक्त केले आहे.याशिवाय जलकुंभ वहाळ ते खारघर पर्यंत १५०० मी.मी. व्यासाची जलवाहिनी कार्यान्वित करण्याचे काम सुरु आहे. सदरच्या तातडीच्या उपाययोजनामुळे ३० दशलक्ष प्रतिदिन ची तुट भरुन आली आहे.

याशिवाय मध्यावधी व दिर्घकालीन उपाययोजना अंतर्गत महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाच्या वाढीव नाव्हाशेवा टप्पा-३ मध्ये सिडको व नैना अंतर्गत वसाहतींसाठी एकुण ६९ दशलक्ष लिटर प्रतिदिन पाण्याचे आरक्षण करण्यात आले आहे. सदर योजनेंतर्गत चालु असलेली कामे सन २०२३-२४ पर्यंत पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

सिडको परिसरामध्ये नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, शिवडी-न्हावा शेवा पारबंदर मार्ग, नवीन गृहनिर्माण प्रकल्प इत्यादीमुळे या परिसरात झपाटयाने वाढणा-या लोकसंख्येचा विचार करून सन २०५० पर्यंत च्या १२७५ दशलक्ष लिटर प्रतिदिन पाणीपुरवठा व जलसंसाधन व्यवस्थापनाचा रोडमॅपला सिडकोच्या संचालक मंडळाने दि.३१.०७.२०२१ च्या बैठकीत मान्यता दिली आहे.

****

लक्षवेधी सूचना क्र. १९

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२२ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन

श्री. अतुल भातखळकर, श्रीमती प्रतिभा धानोरकर, सर्वश्री. छगन भुजबळ, अजित पवार, जयंत पाटील, दिलीप वळसे-पाटील, डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री. धनंजय मुंडे, सुनिल प्रभू, हसन मुश्रीफ, अनिल पाटील, यशवंत माने, शेखर निकम, दिपक चव्हाण, राजेश टोपे, डॉ. राजेंद्र शिंगणे, श्री. दत्तात्रय भरणे, कुमारी आदिती तटकरे, ॲड. माणिकराव कोकाटे, श्री. धर्मारावबाबा आत्राम, श्रीमती सरोज आहिरे, सर्वश्री. रोहित पवार, मनोहर चंद्रिकापूरे, चेतन तुपे, इंद्रनिल नाईक, विजय वडेट्टीवार, सुनिल केदार, सुनिल शेळके, दिलीप मोहिते-पाटील, संदिप क्षिरसागर, संग्राम जगताप, डॉ. किरण लहामटे, सर्वश्री. सुनिल टिंगरे, अबू आजमी, बाळासाहेब पाटील, सुनिल भुसारा, प्रा. वर्षा गायकवाड, वि. स. स., यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र. १९ पुढीलप्रमाणे आहे-

"ता. गोरेगाव (जि. गोंदिया) येथील रहिवाशी असलेल्या व घरगुती वादातून बाहेर पडलेल्या ३० वर्षीय असहाय्य विवाहित महिलेस श्रीराम उरकुडे यांचे सह चार नराधमांनी दिनांक १ ऑगस्ट, २०२२ रोजी वा त्या सुमारास कान्हाळमोह (जि. भंडारा) येथील जंगलात नेऊन तिच्यावर सामूहिक बलात्कार केल्याची घटना उघडकीस येणे, पिडीत महिलेने अत्याचार झाल्यावर पोलीस ठाण्यात तक्रार करण्याकरीता गेली असता पोलीसांनी तिच्याकडे काही लक्ष न देता तिला एका कक्षात ठेवणे, पोलीसांनी काही प्रतिसाद न दिल्याने पिडीत महिला तेथून निघून जाणे, लाखणी (जि. भंडारा) येथील पोलीस अधिका-यांनी अक्षम्य बेजबाबदारपणा दाखविल्याने पीडित महिला आणखी दोन नराधमांच्या तावडीत सापडणे, दिनांक २ ऑगस्ट, २०२२ रोजी सदर महिला विवस्त्र अवस्थेत शेतात आढळून येणे, कारधा पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन तपासाला सुरुवात करणे, यामुळे पीडित महिलेवर सलग दोन दिवस सामूहिक बलात्कार करण्यात येणे, तसेच दिनांक ९ ऑगस्ट, २०२२ रोजी बरांजतांडा (ता. भद्रावती, जि. चंद्रपूर) येथील घमाबाई प्राथमिक-माध्यमिक निवासी आश्रमशाळेतील एका अल्पवयीन मुलीला चाकूचा धाक धाखवून अधिक्षकाने अत्याचार केल्याचे निदर्शनास येणे, या तालुक्यातील बरांजतांडा येथील आश्रमशाळेत ही दुर्दैवी घटना घडणे, सदर पिडीत मुलीची प्रकृती चिंताजनक झाल्याने तिला शाळा प्रशासनाने घरी पठविल्यानंतर मुलीने पालकांना यासंदर्भात माहिती देणे, हिंगणाघाट (जि. वर्धा) येथील पोलीस ठाण्यात पिडीत मुलीच्या पालकांनी याबाबत गुन्हा नोंद करणे, यामुळे अल्पवयीन मुली आणि महिलांमध्ये निर्माण झालेले प्रचंड असुरक्षिततेचे व भीतीचे वातावरण, सदर प्रकरणाची शासनाने उच्च स्तरावरुन सखोल चौकशी करुन दोषी नरधमाविरुध्द कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, राज्यात महिलांवरील अत्याचारांच्या घटनांना पायबंद घालण्यासाठी महाराष्ट्र शक्ती क्रिमिनल लॉ ॲक्ट २०२० आणि मशिनरी फॉर इम्प्लिमेंटेशन ऑफ

महाराष्ट्र शक्ती क्रिमिनल लॉ २०२० या महाराष्ट्र विधानसभेने मंजूर केलेल्या नव्या कायद्यानुसार शासनाने दोषी आरोपीविरुध्द कारवाई करण्याची नितांत आवश्यकता, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी महिला व अल्पवयीन मुलींमध्ये निर्माण झालेली तीव्र असंतोषाचे व चिंतेचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

उप मुख्यमंत्री (गृह) यांचे निवेदन

पोलीस स्टेशन, लाखणी, जि. भंडारा येथील पोलीस कर्मचारी दिनांक ३१.०७.२०२२ रोजी रात्री ८.३० वाजता च्या सुमारास डायल ११२ द्वारे प्राप्त माहितीच्या आधारे पिडीत महिलेस विचारपूस करण्याकरिता पोलीस स्टेशन, लाखणी येथे घेऊन आले. पोलीस स्टेशन, लाखणी, जि. भंडारा येथील कर्तव्यावर असलेल्या महिला पोलीस अंमलदारांनी सदर पिडीत महिलेची चौकशी केली असता सदर पिडीतेने काहीही माहिती दिली नाही. सदर पिडीतेची ओळख पटत नसल्याने, पिडीतेकडून कोणतीही माहिती मिळत नसल्याने आणि रात्रीची वेळ असल्याने पोलिस स्टेशनमधील कर्मचा-यांनी पिडीतेची महिला विश्राम कक्षामध्ये व्यवस्था केली. सदर पिडीता दिनांक ०१.०८.२०२२ रोजी सकाळी ७.३० वाजता च्या सुमारास पोलीस स्टेशन मधून बाहेर पडली.

पोलीस स्टेशन, कारधा येथील पोलीस कर्मचा-यांना दिनांक ०२.०८.२०२२ रोजी सकाळी ८.१६ वाजता कन्हाळमोह जवळ अनोळखी महिला जखमी अवस्थेत असल्याची माहिती मिळाली. पोलीस स्टेशन, कारधा येथील पोलीस कर्मचारी यांनी घटनास्थळावर पोहोचून पिडित महिलेस रुग्णवाहीकेद्वारे सामान्य रुग्णालय, भंडारा येथे दाखल केले. वैद्यकीय अधिकारी यांनी सदर पिडीतेची तपासणी करुन पिडीतेवर लैंगिक अत्याचार झाल्याचा अहवाल दिनांक ०२.०८.२०२२ रोजी दिला. सदर घटनेबाबत पोलीस स्टेशन, कारधा जि. भंडारा येथे दिनांक ०३.०८.२०२२ रोजी ३ आरोपींविरुध्द अप क्र. १७५/२०२२, भारतीय दंड विधान संहिता कलम ३७६ (१), ३७६ (२) (एन), ३७६ (ड), ५०६, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्यातील घटना ही पोलिस स्टेशन, गोरेगांव, जि. गोंदिया यांच्या हद्दीत सुरु होत असल्याने सदरचा गुन्हा पोलिस स्टेशन, गोरेगांव, जि. गोंदिया येथे हस्तांतरित करण्यात आला असून पोलीस स्टेशन, गोरेगांव जि. गोंदिया येथे दिनांक ०४.०८.२०२२ रोजी ३ आरोपींविरुध्द अप क्र.

४०२/२०२२, भारतीय दंड विधान संहिता कलम ३७६ (१), ३७६ (२) (एन), ३७६ (ड), ५०६, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील २ आरोपींना अटक करण्यात आली आहे. अन्य १ आरोपीचा शोध सुरू आहे. सदर गुन्ह्याचा सखोल तपास करण्यासाठी दिनांक ०६.०८.२०२२ रोजी श्रीमती रागसुधा आर., समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. ३, जालना यांच्या अधिपत्त्याखाली विशेष तपास पथक (एस. आय. टी.) गठीत करण्यात आले आहे.

पिडीत महिलेस सुरक्षिततेच्या दृष्टीने शासकीय महिला वस्तीगृह/ वन स्टॉप सेंटर येथे दाखल केले नाही तसेच सदर पिडितेबाबत पोलीस स्थानकाच्या प्रभारी अधिकारी यांना माहिती उपलब्ध करून न देणे, कर्तव्यात कसूर केल्याप्रकरणी पोलीस स्टेशन, लाखणी, जि. भंडारा येथे दिनांक ३१.०७.२०२२ रोजी रात्रपाळीस कर्तव्यात असलेल्या संबंधित पोलीस उप निरीक्षक व सहायक पोलीस उप निरीक्षक यांना दिनांक ०८.०८.२०२२ रोजी सेवेतून निलंबित करण्यात आले आहे. तसेच कर्तव्यावर असलेल्या महिला पोलीस अंमलदाराची पोलीस मुख्यालय, भंडारा येथे बदली करण्यात आली आहे.

मौजे हिंगणघाट, जि. वर्धा येथे राहणा-या आणि घमाबाई माध्यमिक निवासी आश्रमशाळा, बरांज तांडा, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर येथे शिक्षण घेत असलेल्या अल्पवयीन मुलीच्या नातेवाईकाच्या फिर्यादीवरून पोलीस स्टेशन, हिंगणघाट, जि. वर्धा येथे अप. क्र. ९०९/२०२२, भारतीय दंड विधान संहिता कलम ३७६ (२)(ब), ३७६ (२)(क), ३७६(२)(के), ३७६(२), ३७६(२)(आय), ३७६(२)(एन), ३७६(२)(एफ), ३७६(३), ३७६(सी), ५०६, सह लैंगिक अपराधापासून बालकांचे संरक्षण अधिनियम, २०१२ चे कलम ४, ६ सह अल्पवयीन न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ चे कलम ७५ अन्वये दिनांक ०७.०८.२०२२ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचे ठिकाण हे भद्रावती पोलीस स्टेशन, जि. चंद्रपूर यांच्या अखत्यारीमध्ये असल्याने सदर गुन्हा पोलीस स्टेशन, हिंगणघाट, जि. वर्धा येथून पोलीस स्टेशन, भद्रावती, जि. चंद्रपूर येथे हस्तांतरित करण्यात आला आहे. पोलीस स्टेशन, भद्रावती, जि. चंद्रपूर येथे अप. क्र. ३६६/२०२२ अन्वये एका आरोपीविरुध्द दिनांक ०७.०८.२०२२ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यामधील आरोपीस दिनांक ०८.०८.२०२२ रोजी अटक करण्यात आली असून पोलीस तपास सुरू आहे.

महिलांवरील अत्याचारासंदर्भात दाखल गुन्ह्याबाबत दिनांक १२.१०.२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यातील सर्व पोलीस घटकांमध्ये विशेष तपास पथक गठीत करण्यात आले आहे. महिला व बालकांवरील गंभीर गुन्ह्याच्या तपासाबाबत नियमितपणे कार्यपध्दती व मार्गदर्शक सूचना वितरीत करण्यात आल्या आहेत. तसेच गुन्हा दाखल केल्यापासून निर्गती करेपर्यंत म्हणजेच दोषारोप सादर करेपर्यंत कशाप्रकारे अंमलबजावणी करावी याकरीता मानक कार्यप्रणाली (एस ओ पी) जारी केली आहे.

महिला व बालके यांवरील अत्याचाराच्या घटनांना आळा घालण्यासाठी भारतीय दंड संहिता, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ व लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण अधिनियम, २०१२ मध्ये महाराष्ट्र राज्याकरिता सुधारणा करण्याबाबतचे शक्ती फौजदारी कायदे (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, २०२१ हे दिनांक ३१.०१.२०२२ रोजी मा. राष्ट्रपती महोदयांच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आले आहे. मा. राष्ट्रपती महोदयांची मान्यता प्राप्त झाल्यानंतर शक्ती फौजदारी कायदे (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, २०२१ ची अंमलात येईल. तसेच, महिलांच्या व बालकांच्या विरुध्दच्या विवक्षित विनिर्दिष्ट अपराधांची जलदगतीने न्यायचौकशी करण्यासाठी अनन्य विशेष न्यायालये स्थापन करण्यासाठी आणि अशा अपराधांसाठी अमंलबजावणी यंत्रणा गठीत करण्यासाठी आणि त्याच्याशी संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्यासाठीच्या महाराष्ट्र अनन्य विशेष न्यायालये (शक्ती कायद्याखालील महिलांच्या व बालकांच्या विरुध्दच्या विवक्षित अपराधांसाठी) विधेयक, २०२२ हे महाराष्ट्र विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांनी सन २०२२ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये मान्यता दिली आहे. शक्ती फौजदारी कायदे (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, २०२१ अंमलात आल्यानंतर सदर अधिनियमातील तरतुदी अंमलात येतील.

— X —

लक्षवेधी सूचना

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२२ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन

सर्वश्री. सुनिल केदार, विजय वडेट्टीवार, विकास ठाकरे विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

" नागपूर जिल्यातील कोराडी औष्णिक वीज केंद्राचा खसारा येथील राख बंधारा दिनांक १६ जुलै २०२२ रोजी पावसादरम्यान फुटला असणे, राखेचा बंधारा फुटल्यामुळे खसाळा, मसाळा, खैरी या गावातील तसेच परिसरातील शेकडो हेक्टर शेती राखमिश्रित पाण्यात बुडालेली असणे, राखेचा बंधारा फुटल्यामुळे नागपूर शहरातील लाखो नागरिकांना राख मिश्रित पाणी नळाव्दारे येणे, त्यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर झालेला परिणाम, खसारा येथील राख बंधारा बांधताना महाजेनकोव्दारे झालेला निष्काळजीपणा, बंधाराचे काम वेळेपूर्ण न करणे, या बंधाऱ्यावर लक्ष ठेऊन काम करुन घेणाऱ्या महाजेनकोच्या स्थापत्य विभागाचे अधिक्षक अभियंता शिरीष वाठ यांच्याकडे विशिष्ठ अशा महत्वाचे पदाचे अतिरिक्त पदभार देण्यात येणे, त्यामुळे या कामाकडे झालेले दुर्लक्ष, परिणामी या सर्व प्रकारामुळे शेतकऱ्यांचे झालेला लाखो रुपयांचे नुकसान महाजेनकोकडून अद्यापही न मिळाल्याने शेतकऱ्यांत पसरलेले तीव्र असंतोष व संतापाचे वातावरण परिणामी याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

मा. उप मुख्यमंत्री तथा मंत्री (ऊर्जा) यांचे निवेदन

कोराडी औष्णिक विद्युत केंद्र, नागपूर ३x६६० मे.वॅ. संचांमध्ये कोळशाचे ज्वलन झाल्यानंतर तयार होणारी राखेची साठवणूक खसारा बंधाऱ्यामध्ये करण्यात येते, खसारा राख बंधाऱ्याचा आकार सुमारे ३१४ हेक्टरमध्ये विस्तारित असून आतील परीघ साधारण ७ किलोमीटर एवढा आहे.

दिनांक १६ जुलै, २०२२ रोजी सकाळी ११:४० च्या दरम्यान अतिवृष्टीमुळे राख बंधाऱ्याच्या बाहेरील भिंतीवरून पाण्याच्या प्रवाहामुळे अचानक तडा गेला व भगदाड पडून पाण्याचा विसर्ग वेगाने या परिसरात सुरु झाला. त्याअनुषंगाने तात्काळ या परिसरातील व गावातील रहिवाशांना सरपंचामार्फत कळविण्यात आले तसेच पोलीस प्रशासन, जिल्हा प्रशासन, महसूल अधिकारी, आपत्ती व्यवस्थापन, प्रदूषण नियंत्रण मंडळ, जलसंपदा, उपविभागीय अधिकारी, गट विकास अधिकारी, कृषी अधिकारी यांना कळविण्यात येऊन झालेल्या घटनेची माहिती दिली. त्याअनुषंगाने प्रशासनाच्या संबंधित अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीची माहिती घेतली. तसेच ३x६६० मे.वॅ. कोराडी औष्णिक विद्युत केंद्रातील राखेचा विसर्ग तातडीने बंद करण्यात आला.

बंधाऱ्याला भगदाड पडल्यावर, राख मिश्रित पाणी राख बंधाऱ्याच्या सभोवताली (महानिर्मिती हद्दीत) असणारे टो- ड्रेन्स व नाल्या द्वारे वाहून गेले मात्र पाण्यातील राखेचा विसर्ग केवळ टो ड्रेन व ॲश वॉटर रिकव्हरी पंप पर्यन्त गेला, त्याअनुषंगाने महानिर्मितीद्वारे विविध उपाययोजना करून तेथे जमा झालेली राख तातडीने काढण्यात आली.

दि. १६.०७.२०२२ रोजी कोराडी औष्णिक वीज केंद्राचा Ash Pond फुटला आहे, परतुं या Ash Pond चे पाणी कन्हान नदीस महानगर पालिकेच्या जलशुध्दीकरण केंद्रानंतर कन्हान नइीत मिळाल्यामुळे कन्हान जलशुध्दीकरण केंद्रात याचा परिणाम दि.१९.०७.२०२२ पर्यत आढळून आलेला नाही असे नागपुर महानगरपालिकेने जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर यांना कळविले आहे. तथापि, तातडीने खबरदारीच्या उपाययोजनेचा भाग व पाणी पुरवठा करणारा पंप नादुरुस्त झाल्यामुळे परिसरातील गावामध्ये पाणीपुरवठा सुरळीत ठेवण्याकरिता महानिर्मिती कंपनीकडून टँकर द्वारे पाच दिवसांकरिता पाणीपुरवठा करण्यात आला व पम्प दुरुस्त करून देण्यात आले.

सदर राख बंधाऱ्याच्या उंची वाढवायचे काम हे महानिर्मिती स्थापत्य-२ सर्कल कार्यालय कोराडी यांच्यामार्फत सुरू होते व महानिर्मितीद्वारे सदर कार्य मान्सून पूर्व करण्याचे योजले होते व त्याअनूषंगाने निर्धारित कामे हाती घेण्यात आली होती. माहे जून व १ जुलै ते १६ जुलै मधील अतिवृष्टीमुळे कार्यात व्यत्यय आला.

अतीवृष्टीमुळे राख बंधाऱ्याच्या पाण्यामध्ये लक्षणीय वाढ झाल्याने बंधाऱ्याची उंची वाढविण्याचे सुरू असलेल्या कामाच्या घटनास्थळी महानिर्मितीचे अधिकारी व संबंधित कर्मचारी हजर झाले व विसर्ग रोखण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्यात आल्या. पाण्याचा विसर्ग बंद करण्याकरिता तातडीने दोन जेसीबी, चार पोकलेन व आवश्यक मनुष्यबळाचा वापर करून काम सुरू करण्यात आले व त्याच रात्री पाण्याचा विसर्ग पूर्णपणे बंद करण्यात आला, बंधारा मजबुतीचे कार्य अहोरात्र युद्धपातळीवर कार्य करण्यात आले व मजबुती कार्य पूर्ण झाले असून उर्वरित बंधारा उंचीचे कार्य सुरु आहे.

मुख्य कार्यालय, मुंबई व स्थानिक पातळीवर मुख्य अभियंता स्थापत्य- २ यांच्या निर्देशनुसार तसेच संबंधित विभागामधील रिक्तपदामुळे व नियोजित कामे सुरळीत चालविण्याकरिता श्री. शिरीष वाट यांना अतिरिक्त पदभार देण्यात आला होता.

खसारा राख बंधारा घटनेचे गांभिर्य लक्षात घेऊन महानिर्मिती मुख्यालयाद्वारे वरिष्ठ पातळीवर त्रिसदसीय समिती गठित करण्यात आली आहे. सदर समितीद्वारे चौकशी अहवाल सादर केला असून प्रथम दर्शनी माहितीच्या आधारे श्री. शिरीष वाट, अधीक्षक अभियंता (स्था.), स्थापत्य बांधकाम विभाग, कोराडी औष्णिक विद्युत केंद्र व श्री. प्रवीण मडावी, कार्यकारी अभियंता (राख हाताळणी विभाग), कोराडी औष्णिक विद्युत केंद्र यांना ०३ ऑगस्ट -२०२२ च्या आदेशान्वये निलंबित करण्यात आले आहे.

म्हसाळा टोळी येथील १३ बाधीत कुटुंबांना अन्नधान्य (दोन महिन्यांसाठी), गादी-बिछायत साहीत्य, शालेय पुस्तके व स्कुलबॅग वाटप करण्यात आले. खबरदारीच्या उपाययोजना म्हणून परीसरात ब्लिचींग पावडर फवारणी करण्यात आली. तसेच परीसरातील रस्ते साफसफाई करण्यात आली. परिसरातील गावामध्ये पाणीपुरवठा सुरळीत ठेवण्याकरिता महानिर्मिती कंपनीकडून टँकर द्वारे पाच दिवसांकरिता पाणीपुरवठा करण्यात आला व पंप दुरुस्त करून देण्यात आले.

सदर घटनेनंतर तहसीलदार, कामठी यांच्या अहवालानुसार, उपविभागीय दंडाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी मौदा यांच्या दिनांक २८.०७.२०२२ च्या आदेशाप्रमाणे महानिर्मितीद्वारे एकूण ३८ बाधित शेतकरी व गावकऱ्यांपैकी २५ बाधितांना एकुण रु. ४,६०,७२५/- तातडीने नुकसान भरपाईचे धनादेश सुपूर्त करण्यात आला आहे. प्राप्त आदेशानुसार उर्वरित १३ बाधितांना एकुण रु. २,९८,६१० /- चे धनादेश वाटपाचे कार्य उपविभागीय दंडाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी मौदा यांच्या सहकार्याने सुरू आहे. महानिर्मितीद्वारे बाधित परिसरात तातडीने केलेल्या विविध उपायोजना बाबत परिसरातील सरपंच व गावकऱ्यांनी समाधान व्यक्त केल्याचे खैरी व खसाळा ग्रामपंचायतीचे पत्र महानिर्मिती कंपनीस प्राप्त झाले आहे.

****

गृह विभाग **विधानसभा लक्षवेधी सूचना क्र. ५०६**

सन २०२२ चे तिसरे (पावसाळी) अधिवेशन

श्री.सुनिल कांबळे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र. ५०६ पुढीलप्रमाणे आहे :-

"पुणे व पिंपरी चिंचवड शहरातील अनाधिकृत हुक्का पार्लरचा प्रश्न ऐरणीवर आला असणे. या हुक्का पार्लरमुळे काही दिवसापूर्वी मुंबईत लागलेल्या आगीप्रमाणे पुण्यातही आग लागण्याची घटना घडू शकते. त्यामुळे वेळीच अशा बेकायदा हुक्कापार्लरवर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून केली जात असणे, पुणे शहरात कोरेगांव पार्क, मुंढवा, हडपसर, कोंढवा या परिसरात अनेक नामांकित हॉटेल्स व पबमध्ये हुक्कापार्लर चालू असणे, पोलिसांकडून काही प्रमाणात कारवाई केली जाते. मात्र, त्यानंतर ही हुक्का पार्लर पुन्हा सुरु झाल्याचे दिसून येत आहे, काही ठिकाणी छुप्प्या तर कुठे उघड पध्दतीने ही हुक्का पार्लर सुरु आहेत. त्यामुळे अशा हुक्का पार्लरवर वेळीच कारवाई करण्याची आवश्यकता असणे, तरुणाईमध्ये हुक्क्यांची मोठी क्रेझ आहे. पुणे शहरातही हुक्का पार्लरमध्ये तरुणाईची मोठी गर्दी असते. तरुणांकडून तंबाखूच्या सेवानासाठी हुक्क्याचा आधार घेतला जातो. त्यात वेगवेगळया फ्लेवर उपलब्ध करुन देण्यात येतात. पुण्यात हुक्क्यासाठीचे ५२ प्रकारचे फ्लेवर मिळत असून, तरुणांकडून या फ्लेवर्सना अधिक मागणी असल्याची माहिती समोर आली असणे. त्यामुळे पालकांसाठी हुक्का पार्लर ही मोठी डोकेदुखी ठरत आहे. हॉटेलच्या बंद खोल्यांमध्ये हुक्का ओढण्यास उपलब्ध करुन दिला जातो. दुर्देवाने त्या ठिकाणी आगीसारखा प्रकार घडला तर मोठी दुर्घटना घडू शकते. त्यामुळे पोलिसांनी वेळीच जागे होऊन त्यांच्यावर कडक कारवाई करावी, अशी मागणी नागिरकांकडून केली जात असणे यावर शासनाने करावयाची तातडीची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

मा.उप मुख्यमंत्री (गृह) यांचे निवेदन

पुणे शहर व पिंपरी चिंचवड आयुक्तालयांतर्गत हुक्का पार्लर चालविण्यासाठीचा परवाना देण्यात येत नाही. मात्र ज्यावेळी हॉटेल्स, पब किंवा धाबे या ठिकाणी अनधिकृतपणे ग्राहक तंबाखूजन्य पदार्थ वा हुक्काजन्य पदार्थांचे सेवन करताना आढळल्यास किंवा जवळ बाळगल्यास त्यांचेविरूद्ध भा.दं.वि. कलम १८८, २६९, ३४ सह सिगारेट आणि इतर तंबाखू उत्पादने (जाहिरातीस प्रतिबंध आणि व्यापार व वाणिज्य व्यवहार आणि उत्पादन, पुरवठा व वितरण यांचे विनियमन) अधिनियम, २००३ (सुधारित) अधिनियम, २०१८ चे कलम ४ क, २१ क अन्वये योग्य ती कारवाई करण्यात आलेली आहे. राज्यात काही भागांमध्ये सर्रास अंमली पदार्थ / तंबाखुजन्य पदार्थ / हुक्का पार्लरचा धंदा वा सेवन करीत असल्याचे आढळल्यास किंवा तसे धंदा चालत असल्यास संबंधित ठिकाणच्या पोलिस अधिकाऱ्यांना जबाबदार धरण्यात येईल आणि त्या भागामध्ये त्या पोलिस स्टेशनच्या अंतर्गत जर अशा पध्दतीने गैर व अवैध व्यवसाय चालत असेल तर संबंधित अधिकाऱ्यांना जबाबदार धरुन योग्य ती कारवाई करण्यात येईल, अशा सूचना राज्यातील सर्व पोलिस घटक प्रमुखांना दिनांक १८.०३.२०२१ व दिनांक १५.०९.२०२१ रोजीच्या पत्रान्वये देण्यात आलेल्या आहेत.

केंद्र शासनाच्या सिगारेट आणि इतर तंबाखू उत्पादने (जाहिरातीस प्रतिबंध आणि व्यापार व वाणिज्य व्यवहार आणि उत्पादन, पुरवठा व वितरण यांचे विनियमन) अधिनियम, २००३ मध्ये राज्य शासनाने सुधारणा करुन सदर अधिनियमात हुक्का पार्लरचा समावेश केला आहे. सदर (सुधारित)

अधिनियम, २०१८ दिनांक ०४.१०.२०१८ पासून अस्तित्वात आला असून राज्यामध्ये हुक्का पार्लरवर बंदी लागू करण्यात आली आहे.

सुधारित अधिनियम, २०१८ मधील कलम-४ क नुसार "कोणतीही व्यक्ती स्वत:हून किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या वतीने, खाद्यगृहाच्या जागेसह कोणत्याही जागी हुक्का बार सुरु करणार नाही किंवा चालवणार नाही" तसेच, २१-क नुसार कलम-४ क च्या तरतूदींचे उल्लंघन करणाऱ्यास एक ते तीन वर्षे पर्यंत कारावासाची आणि रुपये पन्नास हजार ते एक लाख रुपयांपर्यंत एवढया द्रव्यदंडाच्या शिक्षेची तसेच, कलम २७-क नुसार कलम ४-क खालील अपराध दखलपात्र असतील, अश्या प्रावधानांची तरतूद करण्यात आली आहे. सदर कायद्यानुसार कारवाई करण्यासाठी सहायक पोलिस निरीक्षक दर्जापेक्षा कमी नसलेल्या अधिकाऱ्यास त्यांच्या कार्यक्षेत्राकरिता प्राधिकृत करण्यात आले आहे.

सिगारेट आणि इतर तंबाखू उत्पादने (जाहिरातीस प्रतिबंध आणि व्यापार व वाणिज्य व्यवहार आणि उत्पादन, पुरवठा व वितरण यांचे विनियमन) अधिनियम, २००३ व सुधारणा अधिनियम, २०१८ मधील तरतूदीनुसार पुणे शहर व पिंपरी चिंचवड पोलिस आयुक्तालयांतर्गत सन २०२२ मध्ये अवैधरित्या सुरु असलेल्या हुक्का पार्लरवर करण्यात आलेल्या कारवाईचा तपशील पुढीलप्रमाणे आहे:-

पुणे शहर आयुक्तालय

दाखल गुन्हे	अटक आरोपी	जप्त मुद्देमाल किंमत
२७	२७	रू. ५,९४,३७०/-
चतुश्रुंगी पोलिस ठाणे-१, हडपसर पोलिस ठाणे-१, बिबवेवाडी पोलिस ठाणे- १, विमानतळ पोलिस ठाणे-३, मुंढवा पोलिस ठाणे-५, भारती विद्यापीठ पोलिस ठाणे-१, चंदननगर पोलिस ठाणे-१, सहकारनगर पोलिस ठाणे-२, वानवडी पोलिस ठाणे-२, कोंढवा पोलिस ठाणे-१० असे एकूण २७ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.		

पिंपरी चिंचवड आयुक्तालय

दाखल गुन्हे	अटक आरोपी	जप्त मुद्देमाल किंमत
१०	२२	रू. ४,४६,९९५/-
हिंजवडी पोलिस ठाणे-८, रावेत पोलिस ठाणे-१, सांगवी पोलिस ठाणे-१ असे एकूण १० गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.		

सिगारेट आणि इतर तंबाखू उत्पादने (जाहिरातीस प्रतिबंध आणि व्यापार व वाणिज्य व्यवहार आणि उत्पादन, पुरवठा व वितरण यांचे विनियमन) अधिनियम, २००३ मध्ये सुधारणा करुन सुधारित अधिनियम, २०१८ अन्वये संपूर्ण राज्यात हुक्का पार्लरवर बंदी घातली असल्याने सदर तरतूदींचे उल्लंघन होत असल्यास वा तसे निष्पन्न झाल्यास संबंधितांवर पोलिस यंत्रणेमार्फत वेळीच कारवाई करण्यात येते आणि अशा प्रकारच्या घटनांची पुनर्रावृत्ती होऊ नये, यादृष्टीने पोलिस प्रशासनाकडून जनजागृती करणे, या पदार्थांच्या व्यसनाचे शरीरावर होणारे दुष्परिणाम याबद्दल मार्गदर्शन करणे, शाळा कॉलेज परिसरात विशेष निगराणी ठेवणे, पेट्रोलिंग करणे, आयटी क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांना तंबाखूजन्य व हुक्का यासारख्या व्यसनांना बळी न पडण्याचे आवाहन करून जनजागृती करण्यात येते इत्यादी आवश्यक अशा उपाययोजना करण्यात येत आहेत.

****

३९.

२३४

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२२ चे ~~दुसरे~~ तृतीय (पावसाळी) अधिवेशन

श्री.दौलत दरोडा, वि.स.स यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक २३४ पुढील प्रमाणे आहे :-

"शहापूर तालुक्यातील (जि. ठाणे) माहूली किल्ल्यावर उगम पावलेल्या भारंगी नदीवर पर्यटन विकास निधीतून सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत सुमारे २ कोटी ५० लाख रुपयाची विकास कामे करण्यात येणे, परंतु सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नियोजनशून्य कारभारामुळे सदरची विकासकामे माहे जुलै,२०२२ रोजीच्या पावसात वाहून जाणे, सदरची कामे नदी पात्रात केल्यामुळे नदीपात्राला अडथळा निर्माण होऊन या बांधकामामुळे नदीला पूर येऊन नदीचे पाणी आसपासच्या १५ मिटर परिसरात घुसन या संपूर्ण विकासकामांचा बट्टयाबोळ होणे, या आधीच अनेक निसर्गप्रेमी संस्था आणि स्थानिक नागरिक यांनी या कामाला लेखी विरोध करुन शहापूर तहसिलदार यांनी मनाई आदेश देण्यात आले असतांना जिल्हाधिकारी यांनी या कामाचे भूमिपूजन करुन काम करण्यात येणे, नदीरेषेपासून १५ मिटर अंतरात बांधकाम करण्यात येऊ नये असा शासकीय नियम असतांना या नियमांची पायमल्ली करण्यात येणे, या प्रकारामुळे पर्यावरणी प्रेमी व स्थानिकांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने चौकशी करून संबंधित दोषींवर कडक कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कारवाई, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

मा. मंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) विभाग यांचे निवेदन

शहापूर तालुक्यातील शहापूर गावातून जाणा-या भारंगी नदीचा काठ व परिसर हे 'क' दर्जाचे पर्यटन स्थळ आहे. शहापूर शहरातून वाहणा-या भारंगी नदीवर १० मी. चे २ गाळे असलेला पूल अस्तित्वात असून सदर पुलाच्या बाजूला गणेश घाट अस्तित्वात आहे. सदर घाटाचा भूखंड मोकळा असून या मोकळया जागेचे सुशोभिकरण करण्याचे काम तत्कालीन लोकप्रतिनिधी यांनी प्रस्तावित केले होते. त्यास अनुसरुन जिल्हाधिकारी, ठाणे यांनी दि.१०.०९.२०१९ रोजीच्या पत्रान्वये शहापूर तालुक्यातील भारंगी नदीला लागून असलेल्या भूखंडाचा विकास करण्याच्या रु.१७६.२६ लक्ष रकमेच्या कामास प्रशासकीय मान्यता दिली. सदर कामामध्ये खालील ४ कामांचा समावेश आहे.

१) भारंगी नदीला लागून संरक्षक भिंत व जॉगिंग ट्रॅक करणे ---- रु.९१.०६ लक्ष

२) भारंगी नदीला लागून संरक्षक भिंत तयार करणे ---- रु. २४.०२ लक्ष

३) भारंगी नदी घाटाचे तसेच कळभे बोरशेती ग्रामपंचायत अंतर्गत असलेल्या मोकळया भूखंडाचा विकास करुन पार्कींग व्यवस्था करणे ---- रु. ४९.७३ लक्ष

४) भारंगी नदीच्या बाजूला प्रस्तावित उद्यानामध्ये व्यायामाचे साहित्य बसविणे ---- रु. ११.४५ लक्ष

एकूण-- रु.१७६.२६ लक्ष

या कामांपैकी संरक्षक भिंत व जॉगिंग ट्रॅकच्या कामास सार्वजनिक बांधकाम विभागाकडून दि.०७.१२.२०२० रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आले.

जुलै महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे तसेच नदी परिसरातील भौगोलिक परिस्थितीमुळे काही वेळा भारंगी नदीच्या पाण्याच्या पातळीत वाढ होऊन सदर पाण्याची पातळी संरक्षक भिंतीच्या वर गेल्याचे निदर्शनास आले. तथापि, पाण्याच्या पातळीत वाढ झाल्यामुळे या ठिकाणी बांधण्यात आलेल्या घाटाचे व उद्यानाचे कोणतेही नुकसान झाल्याचे निदर्शनास आलेले नाही. सद्य:स्थितीत या ठिकाणी करण्यात आलेले बांधकाम सुस्थितीत आहे.

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२२ चे तृतीय अधिवेशन

लक्षवेधी सूचना क्र. २४६

श्री. दौलत दरोडा, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. २४६ :-

"वाडा तालुक्यातील (जि. ठाणे) पीक ते आंबेपाडा या मार्गावर शिलोत्तर गावाजवळ गारगाई नदीला माहे जुलै, २०२२ रोजीच्या सुमारास आलेल्या महापूरात पूलाच्या भागावरील रस्ताच वाहून जाणे, यामुळे चिंचपाडा गावाकडे जाणारी बससेवा बंद होणे, गारगाव परिसराला जोडणारा हा महत्वाचा पूल असून सदरील पूर नादुरुस्त झाल्याने या पूलाची नव्याने उभारणी करण्याची मागणी तेथील नागरिकांनी वारंवार करण्यात येणे, परंतु अद्यापही प्रशासनाकडून कोणतीच कार्यवाही होत नसल्याने त्यांच्यात निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, शासनाने या पूलाची तातडीने दुरुस्ती करुन नव्याने पूलाची उभारणी करण्यासंदर्भात निर्णय घेण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका. "

मा. सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री यांचे निवेदन

विक्रमगड मलवाडा गारगाव मांडवा किमी ०/०० ते २४/२०० हा प्रजिमा ३९ दर्जाचा रस्ता आहे. हा रस्ता विक्रमगड व वाडा या दोन तालुक्यांना जोडतो. या रस्त्याची किमी ११/५०० ते २४/२०० ही लांबी वाडा तालुक्यात असून या रस्त्याची रुंदी ३.७५ मीटर आहे व रस्ता डांबरीकरणाचा आहे. या रस्त्याने वाडा तालुक्यातील पिक,शिलोत्तर, गारगाव,मांडवा ही मुख्य गावे जोडली जातात.

या रस्त्यावर साखळी क्र. १६/५०० मध्ये गारगाई नदीवर / नाल्यावर ६०.०० मीटर लांबीचा बुडीत पूल (Submersible bridge) आहे. पावसाळयात अतिवृष्टी झाल्यास सदर पुल ४ ते ५ वेळा पाण्याखाली जाऊन या भागातील जनतेचा काही कालावधीकरिता तालुक्याशी संपर्क तुटतो. हा पुल पाण्याखाली जात असल्याने या पुलाच्या पोचमार्गाची वेळोवेळी दुरुस्ती करावी लागते. यावर्षीच्या पावसाळयातही सदरील पूल तीन वेळा पाण्याखाली गेल्याने पोचमार्ग क्षतीग्रस्त झाले होते. सद्यस्थितीत सदर रस्त्यांची दुरुस्ती करुन रस्ता सुस्थितीत असून रस्त्यावरील वाहतुक सुरळीत सुरु आहे.

या ठिकाणी उंच पुल बांधण्याचे काम शासनाच्या प्रचलित निकष, मंजूरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन राहील.

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२२ चे तृतीय अधिवेशन

लक्षवेधी सूचना क्र.२५३

श्री.दौलत दरोडा,वि.स.स.,यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.२५३:-

"आज संपूर्ण देशात स्वातंत्र्यदिनाचा अमृत महोत्सव साजरा करीत असतांना शहापूरातील (जि.ठाणे) विद्यार्थ्यांना शाळा गाठण्यासाठी नदीतून जीवघेणारा प्रवास करावा लागत असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०२२ रोजीच्या सुमारास निदर्शनास येणे, शहापूर तालुक्यातील भितारवाडी,चाफेवाडी आणि कोठेवाडी या वाडयाकरीता चाफेवाडी येथे जिल्हा परिषदेची पाचवीपर्यंतची शाळा असून येथील विद्यार्थ्यांना नेहमीच शाळेत जाण्याकरीता नदीतून प्रवास करावा लागणे, पावसाळयात नदीची पातळी वाढत असल्याने अनेकदा विद्यार्थ्यांना शाळेत जाणे कठीण होत असल्याने त्याचे होणारे शैक्षणिक नुकसान, या संदर्भात तेथील पालकांनी वारंवार प्रशासनाकडे अर्ज विनंत्या करून त्याकडे होत असलेले दुर्लक्ष, परिणामी त्यांच्यात निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

मा. मंत्री सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) यांचे निवेदन

प्रस्तुत लक्षवेधी सूचनेमध्ये नमूद केलेल्या मौजे चाफेवाडी,भितारवाडी व कोठेवाडी या वाडया गुंडे- डेहणे,ता.शहापूर या ग्राम पंचायत अंतर्गत येतात, या ठिकाणी चाफेवाडी येथे असलेल्या जिल्हा परिषद शाळेत जाण्यासाठी भितारवाडी व कोठेवाडी येथील एकुण १२ विद्यार्थ्यांना त्यादरम्यान असलेल्या नदीला ओलांडून जावे लागते.

मौजे गुंडे येथून वालशेत कडे जाणारा रस्ता ग्रामीण मार्ग क्र.३५७ या दर्जाचा असून या रस्त्याच्या सा.क्र.०/७०० पासून डावी बाजूकडे चाफेवाडीला जोडणारा रस्ता ग्रा.मा.क्र.३५९ असून त्याची लांबी १.६०० किमी इतकी आहे. वालशेत पासून पुढे कोठेवाडीला जोडणारा रस्ता ग्रा.मा.क्र.३५८ दर्जाचा असून त्याची लांबी २ कि.मी. इतकी आहे. तसेच या रस्त्यादरम्यान

भितारवाडीला जोडणारा रस्ता ग्रा.मा.३५६ असून त्याची लांबी ०.५०० कि.मी. इतकी आहे. वरील सर्व रस्ते वर्गीकृत असून जिल्हा परिषदेच्या अखत्यारीत असून वाहतूकीस योग्य आहेत.

भितारवाडी आणि कोठेवाडी या गावातून चाफेवाडी या गावाकडे जाण्यासाठी अवर्गीकृत रस्ता असून सदर मार्गामध्ये येणाऱ्या नदीवर पूल अथवा साकव उपलब्ध नाही. तथापि, विषयांकित भितारवाडी येथील ३ आणि कोठेवाडी येथील ९ अशा एकुण १२ शालेय विद्यार्थ्यांना चाफेवाडी येथील शाळेऐवजी आता वालशेत येथील शाळेमध्ये वर्ग केले असल्याचे कार्यकारी अभियंता (बांधकाम),जिल्हा परिषद,ठाणे यांनी त्यांच्या अहवालामध्ये नमूद केले आहे. त्यामुळे सद्यस्थितीत सदर १२ विद्यार्थ्यांना नदी ओलांडून शाळेत जाण्याची आवश्यकता भासत नाही.

तथापि, सदर भितारवाडी व कोठेवाडी या गावातून चाफेवाडी या गावाकडे जाणाऱ्या अवर्गीकृत मार्गातील नदीवर नाबार्ड/साकव बांधणे बाबत जिल्हा परिषद,ठाणे यांनी त्यांच्या दि.१९.८.२०२२ च्या पत्राद्वारे सार्वजनिक बांधकाम विभाग, यांच्याकडे विनंती केली आहे.

त्यानुसार सदर ठिकाणी साकव बांधण्याबाबतचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाद्वारे तयार करून सदर प्रस्ताव हा जिल्हा नियोजन समितीस निधी उपलब्धतेसाठी सादर करण्यात येईल. निधी उपलब्धतेच्या अधीन राहून सदरचे काम हाती घेण्याचे नियोजन राहील.

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२२ चे तृतीय अधिवेशन

लक्षवेधी सूचना क्र. ३००

श्री.छगन भुजबळ, श्री. अजित पवार , श्री. जयंत पाटील, श्री. दिलीप वळसे-पाटील, श्री. धनंजय मुंडे, डॉ. जितेंद्र आव्हाड, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. ३०० :-

"नाशिक - निफाड -येवला प्रमुख राज्यमार्ग क्र. २ मृत्युचा सापळा बनल्यामुळे दिनांक ११ ऑगस्ट २०२२ रोजी रस्त्यावर नागरिकांनी आंदोलन केलेले असणे, या रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात असणे, अतिवृष्टीमुळे राज्यात अनेक ठिकाणी रस्त्यांची दुरावस्था होवून वाहनांचे अपघात वाढलेले असणे, त्यातून नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण झालेला असणे, आशियाई विकास बँक अर्थसहाय्य अंतर्गत नाशिक-औरंगाबाद रस्त्याच्या कामाला प्रशासकीय मान्यता देऊन काम चालू करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २३ जुलै २०२२ रोजी वा त्या सुमारास शासनाकडे निवेदनाद्वारे मागणी केलेली असणे, नाशिक-निफाड-येवला-वैजापूर-औरंगाबाद रस्ता प्र.रा.मा.क्र.२ या चौपदरी रस्त्याची पिंपळस (ता.निफाड,जि.नाशिक) ते येवला या भागात कि.मी.१७९/०० ते २३५/०० दरम्यान अत्यंत बिकट अवस्था झालेली असणे, हा रस्ता मुंबई व मराठवाडयाला जोडणारा प्रमुख रस्ता असणे, या रस्त्यावरुन मोठया प्रमाणात द्राक्ष व कांदा या शेतीमालाची वाहतूक होत असणे, तसेच येवला येथील सुप्रसिध्द पैठणी निर्मिती स्थळ व विंचूर येथील वायनरी आणि औदयोगिक वसाहत या रस्त्यालगत असणे, सदर रस्त्याची अनेक ठिकाणी खड्डे पडून चाळण झालेली असणे, आशियाई विकास बँकेच्या अर्थसहाय्यामधून या रस्याची सुधारणा करण्याचे प्रस्तावित असणे,या रस्त्याचा ADB अंतर्गत DPR -२२ मध्ये समावेश झालेला असणे, या रस्त्याला आशियाई विकास बँक अर्थसहाय्यीत महाराष्ट्र रस्ते सुधारणा प्रकल्पांतर्गत प्रशासकीय मान्यता देऊन निधी उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता असणे, त्याचबरोबर अतिवृष्टीमुळे दुरावस्था झालेल्या रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी तातडीने भरीव निधी उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया . "

मा. सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री यांचे निवेदन

नाशिक-निफाड-येवला-वैजापूर प्रमुख राज्यमार्ग क्र. २ या रस्त्याचा कि.मी.१४९/९०० ते २२८/३०० व २३५/०० ते २५१/३०० अशी एकूण ९४.७० किमी लांबी आहे. किमी २२८/३०० ते २३५/०० ही लांबी राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या ताब्यात आहे.

रोयम/515 (710-8-22)

[illegible]

सदर रस्त्यावरील कि.मी.१५५/३०० ते १७९/०० व किमी २३५/०० ते २५१/३०० या ४० किमी लांबीत खाजगीकरणांतर्गत प्रकल्पाच्या सवलत करारनाम्यातील तरतूदीनुसार संबंधित उद्योजकाने मे २०२२ मध्ये डांबरी नुतनीकरणाचे काम पूर्ण केले असून सदर लांबी वाहतुकीकरिता सुस्थितीत आहे. उर्वरीत लांबीमध्ये ४७.८५० किमी मध्ये डांबरीकरणाचे काम पूर्ण झाले आहे. ०.७ किमी लांबीमध्ये डांबरीकरणाचे काम मंजूर निविदा प्रक्रिया पूर्ण करुन काम हाती घेण्याचे नियोजन आहे. उर्वरीत लांबीत द्विवार्षिक देखभाल व दुरुस्ती अंतर्गत रस्त्यावरील खड्डे वेळोवेळी भरण्यात येतात. त्यामुळे सदर रस्ता वाहतुकीकरिता सुस्थितीत असून अपघात विरहीत आहे.

नाशिक-निफाड-येवला प्रमुख राज्यमार्ग क्र. २ या रस्त्याचा कि.मी. १७९/०० ते २३५/०० या लांबीतील कामाचा सविस्तर प्रकल्प अहवाल(DPR-२२) तयार करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. आशियाई विकास बँकेच्या (ADB) अर्थसहाय्याने करावयाच्या रस्ते सुधारणा प्रकल्पांतर्गत सद्यस्थितीत या कामाचा समावेश नाही.

आशियाई विकास बँकेच्या अर्थसहाय्याने करावयाच्या पुढील ५०० दशलक्ष अमेरिकन डॉलर अर्थसहाय्यामध्ये समाविष्ट करावयाच्या कामांची यादी अद्याप अंतिम करण्यात आलेली नाही.

या योजनेमध्ये कामे समाविष्ट करतांना जागेची उपलब्धता, अतिक्रमण मुक्त लांबी, वन विभाग व पर्यावरण विभागाची परवानगी आवश्यकता नसणे, रस्त्यावरील वाहतुक वर्दळ, पर्यटन / धार्मिक स्थळे, दारिद्रय निर्देशांक, मानवी विकास निर्देशांक इत्यादी निकषांचा विचार करण्यात येतो. सदर काम या निकषांच्या तपासणीनंतर प्रकल्पांतर्गत समाविष्ट झाल्यास, हाती घेण्यात येईल.

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२२ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन

श्री. नारायण कुचे व श्री. सुनिल प्रभू मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम क्र. १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र. ४०४

"जिल्हा जालना येथील अंबड तालुक्यातील स्वस्त धान्य दुकानदार यांच्या अडचणी व समस्यांबाबत"

" जिल्हा जालना येथील अंबड तालुक्यातील सुमारे १९५ रास्त भाव दुकानदार यांनी माहे नोव्हेंबर २०२१ मध्ये तहसील कार्यालयात अन्नधान्य यांची मंजुरी घेऊन बँकेतील भरलेली चलन समंधित प्रशासनाकडे मुदत पूर्वी सादर केली असणे, परंतु चालान भरलेल्या सर्व १९५ रास्त भाव दुकानदार यांच्या पैकी फक्त १५९ दुकानदार यांनाच समंधित धान्य पुरवठा करणाऱ्या यंत्रणा यांनी नियमीत योजनेचे धान्य वितरित, पोच केल्याचे आढळून येणे, परंतु उर्वरित ३६ रास्त भाव दुकानदार यांना अन्नधान्य पुरवठा आद्यपही समंधित वितरण प्रशासनाने केल्या नसल्याचे ही धक्कादायक प्रकार उघडकीस आला असणे, तसेच पंतप्रधान गरीब कल्याण अन्न योजना यातील मोफत वाटप करण्यात येणारे धान्य माहे नोव्हेंबर २०२१ चे अंबड तालुक्यातील सुमारे १९५ स्वस्त धान्य दुकानदार यांचे पैकी फक्त १६ रास्त भाव दुकानदार यांनाच वितरित करण्यात आले असल्याचेही निदर्शनास येत असणे, परंतु उर्वरित सुमारे १७९ दुकानदार यांना आद्यपही अन्नधान्य वितरित केले नसल्याचेही निदर्शनास येत असणे, तसेच अशा घटना वारंवार घडत होतं असल्याने माहे फेब्रुवारी २०२२ मध्ये ही अंबड तालुक्यातील १९५ स्वस्त धान्य दुकानदार यांनी चालान भरूनही फक्त ५४ दुकानदार यांनाच धान्य वितरित करणेत आले असून उर्वरित १४५ दुकान धारकांना धान्य वितरित केले नसणे, तसेच प्राधान्य कुटुंब लाभार्थी व अंत्योदय अनुदान योजनेतून गहू वितरित केल्याचेही निदर्शनास येत असणे, तसेच अंबड तालुक्यातील स्वस्त धान्य दुकानात माहे एप्रिल २०२२ मध्ये पुरवठा विभाग प्रशासनाने फक्त तांदूळच वितरीत करण्यात आला परंतु गहू मात्र आद्यपही वितरित केला नसल्याचे ही निदर्शनास येत असणे, तसेच अंबड तालुक्यातील स्वस्त धान्य पुरवठा करणारे दुकानदार अन्न धान्य लागणारे परमिट किंव्हा मागणी पाहिजे असणारे मालाचे मूल्य, संबंधित पुरवठा विभागात देतात परंतु प्रत्येक्षात मात्र धान्य वितरक करणारे प्रशासनातील अधिकारी, कर्मचारी हे मात्र दुकानदार यांनी भरल्याचे चालाना (पावती) प्रमाणे धान्य वितरण करत नसल्याचे ही आढळून आले असणे, तसेच सदरील धान्य वितरण करतांना शासकीय वाहनातून नेताना परमिट प्रमाणे मोजून देत नसल्याचेही गंभीर प्रकार वारंवार घडत असल्याचेही निदर्शनास आले असणे,

तसेच अंबड तहसील प्रशासनाच्या मनमानी कारभारामुळे स्वस्त धान्य दुकानदार यांनि चालाण वेळेत भरूनही धान्यच उशिरा दिल्या मुळे धान्य वाटप करण्यात अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे ही आढळून येत असणे, परिणामी माहे जून २०२२ महिन्याचा डाटा ई-पॉस मशीनवर दिनांक

३०/०७/२०२२ पर्यंत उपलब्ध असल्याने काही दुकानदार यांना आधी जून महिन्याचा धान्याचा पुरवठा माहे जुलै ला वितरित करण्यात आल्यामुळे अडचणींचा सामना करावा लागत असणे,

परिणामी अंबड तालुक्यातील १९५ स्वस्त धान्य दुकानदार यांनी अंबड तालुका स्वस्त धान्य दुकानदार संघटना यांचे कडे धाव घेऊन न्याय देण्याचीही मागणी करण्यात येणे, तसेच उपरोक्त संघटना यांनी वरील प्रकार बाबत समंधित तहसील प्रशासनाकडे विचारणा व वारंवार विनंती करूनही आद्यप स्वस्त धान्य दुकानद्वार यांना कोणताही न्याय मिळाला नसणे, परिणामी उदासीन तहसील प्रशासनामुळे पुरवठा करणाऱ्या भ्रष्ट यंत्रणेमुळे स्वस्त धान्य दुकानदार याच्या वर होणाऱ्या अन्यायामुळे गोरगरीब जनतेला मात्र वेठीस धरले जात असणे, तसेच उपरोक्त प्रकारामुळे सामान्य जनतेला उपाशीपोटी जीवन व्यतीत करावे लागत असून जनतेच्या रोषाला मात्र स्वस्त धान्य दुकानदार यांना सामोरे जावे लागत असणे, परिणामी शासनाने या प्रकरणी त्वरित लक्ष घालून दर महिन्याला अन्न धान्य सुरळीत पुरवठा व्हावा व ई-पॉस मशीन प्रणाली मध्ये सुधारणा करावी अशीही मागणी जनतेतून व स्वस्त धान्य दुकानदार यांचे कडून वारंवार करणेत येत असणे, परंतु शासनाने आद्यपी अंबड स्वस्त धान्य दुकानदार प्रकरणी कोणतीही कारवाई केली नसल्याने स्वस्त धान्य दुकानदार व सामान्य जनमानसात शासनाच्या प्रति तीव्र असंतोष निर्माण झाला आहे, परिणामी शासनाने तातडीने करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

मा. मंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांचे निवेदन

सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत जालना जिल्ह्याकरिता आवश्यक अन्नधान्याची उचल वखार महामंडळ, भोकरदन व बोरखेडी येथील गोदामांतून करण्यात येते. सदर गोदामांतील हमालांच्या कंत्राटास भारतीय अन्न महामंडळाकडून मुदतवाढ न मिळाल्यामुळे सदर गोदामांतून अन्नधान्याची उचल दि. १४.११.२०२१ रोजी बंद करण्यात आली. तसेच, आवश्यक अन्नधान्याची उचल जालना येथून करुन देण्याबाबत दि. २३.११.२०२१ च्या पत्रान्वये भारतीय अन्न महामंडळास विनंती करण्यात आली. त्यानुसार भारतीय अन्न महामंडळाने त्यांच्या दि. २७.११.२०२१ च्या ई-मेल द्वारे आवश्यक अन्नधान्याची उचल औरंगाबाद येथून करण्याबाबत कळविले. त्यामुळे धान्याच्या उचलीस कमी कालावधी मिळाल्याने अन्नधान्याची उचल कमी झाली होती. त्यामुळे काही रास्तभाव दुकानदारांना अन्नधान्य वितरण शिल्लक राहिलेले आहे. तथापि, रास्तभाव दुकानदार यांनी त्यांच्याकडील शिल्लक अन्नधान्यातून पात्र लाभार्थ्यांना अन्नधान्याचे वितरण केले असून धान्य न मिळाल्याबाबत लाभार्थ्यांच्या तक्रारी प्राप्त नाहीत. माहे नोव्हेंबर, २०२१ मधील अन्नधान्याचे वितरण विहीत कालावधीत पूर्ण न झाल्याने सदर अन्नधान्याच्या वितरणाची मुदत इ-पॉस मशिनवर माहे डिसेंबर, २०२१ पर्यंत वाढविण्यात आली होती. सदर कालावधीत पात्र लाभार्थ्यांना अन्नधान्याचे वितरण करण्यात आले आहे. माहे नोव्हेंबर, २०२१ करिता उपलब्ध करुन दिलेल्या अन्नधान्याच्या उचलीस मुदतवाढ मिळाल्यानंतर शिल्लक अन्नधान्याची उचल करण्यात आली आहे.

माहे फेब्रुवारी, २०२२ मध्ये वखार महामंडळ, भोकरदन व बोरखेडी येथील गोदामांतील हमाल कामगारांनी वराईमध्ये दरवाढ न दिल्याच्या कारणास्तव काम बंद केले होते. त्यामुळे भारतीय अन्न महामंडळाने दिलेल्या निर्देशानुसार औरंगाबाद गट नं. ५७ येथील गोदामातून अन्नधान्य उचल सुरु करण्यात आली. तथापि, तेथील हमाल कामगारांनीदेखील वराईमध्ये दरवाढ न दिल्याच्या कारणास्तव

३०/०७/२०२२ पर्यंत उपलब्ध असल्याने काही दुकानदार यांना आधी जून महिन्याचा धान्याचा पुरवठा माहे जुलै ला वितरित करण्यात आल्यामुळे अडचणींचा सामना करावा लागत असणे,

परिणामी अंबड तालुक्यातील १९५ स्वस्त धान्य दुकानदार यांनी अंबड तालुका स्वस्त धान्य दुकानदार संघटना यांचे कडे धाव घेऊन न्याय देण्याचीही मागणी करण्यात येणे, तसेच उपरोक्त संघटना यांनी वरील प्रकार बाबत समंधित तहसील प्रशासनाकडे विचारणा व वारंवार विनंती करूनही आद्यप स्वस्त धान्य दुकानद्वार यांना कोणताही न्याय मिळाला नसणे, परिणामी उदासीन तहसील प्रशासनामुळे पुरवठा करणाऱ्या भ्रष्ट यंत्रणेमुळे स्वस्त धान्य दुकानदार याच्या वर होणाऱ्या अन्यायामुळे गोरगरीब जनतेला मात्र वेठीस धरले जात असणे, तसेच उपरोक्त प्रकारामुळे सामान्य जनतेला उपाशीपोटी जीवन व्यतीत करावे लागत असून जनतेच्या रोषाला मात्र स्वस्त धान्य दुकानदार यांना सामोरे जावे लागत असणे, परिणामी शासनाने या प्रकरणी त्वरित लक्ष घालून दर महिन्याला अन्न धान्य सुरळीत पुरवठा व्हावा व ई-पॉस मशीन प्रणाली मध्ये सुधारणा करावी अशीही मागणी जनतेतून व स्वस्त धान्य दुकानदार यांचे कडून वारंवार करणेत येत असणे, परंतु शासनाने आद्यपी अंबड स्वस्त धान्य दुकानदार प्रकरणी कोणतीही कारवाई केली नसल्याने स्वस्त धान्य दुकानदार व सामान्य जनमानसात शासनाच्या प्रति तीव्र असंतोष निर्माण झाला आहे, परिणामी शासनाने तातडीने करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

मा. मंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांचे निवेदन

सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत जालना जिल्ह्याकरिता आवश्यक अन्नधान्याची उचल वखार महामंडळ, भोकरदन व बोरखेडी येथील गोदामांतून करण्यात येते. सदर गोदामांतील हमालांच्या कंत्राटास भारतीय अन्न महामंडळाकडून मुदतवाढ न मिळाल्यामुळे सदर गोदामांतून अन्नधान्याची उचल दि. १४.११.२०२१ रोजी बंद करण्यात आली. तसेच, आवश्यक अन्नधान्याची उचल जालना येथून करुन देण्याबाबत दि. २३.११.२०२१ च्या पत्रान्वये भारतीय अन्न महामंडळास विनंती करण्यात आली. त्यानुसार भारतीय अन्न महामंडळाने त्यांच्या दि. २७.११.२०२१ च्या ई-मेल द्वारे आवश्यक अन्नधान्याची उचल औरंगाबाद येथून करण्याबाबत कळविले. त्यामुळे धान्याच्या उचलीस कमी कालावधी मिळाल्याने अन्नधान्याची उचल कमी झाली होती. त्यामुळे काही रास्तभाव दुकानदारांना अन्नधान्य वितरण शिल्लक राहिलेले आहे. तथापि, रास्तभाव दुकानदार यांनी त्यांच्याकडील शिल्लक अन्नधान्यातून पात्र लाभार्थ्यांना अन्नधान्याचे वितरण केले असून धान्य न मिळाल्याबाबत लाभार्थ्यांच्या तक्रारी प्राप्त नाहीत. माहे नोव्हेंबर, २०२१ मधील अन्नधान्याचे वितरण विहीत कालावधीत पूर्ण न झाल्याने सदर अन्नधान्याच्या वितरणाची मुदत इ-पॉस मशिनवर माहे डिसेंबर, २०२१ पर्यंत वाढविण्यात आली होती. सदर कालावधीत पात्र लाभार्थ्यांना अन्नधान्याचे वितरण करण्यात आले आहे. माहे नोव्हेंबर, २०२१ करिता उपलब्ध करुन दिलेल्या अन्नधान्याच्या उचलीस मुदतवाढ मिळाल्यानंतर शिल्लक अन्नधान्याची उचल करण्यात आली आहे.

माहे फेब्रुवारी, २०२२ मध्ये वखार महामंडळ, भोकरदन व बोरखेडी येथील गोदामांतील हमाल कामगारांनी वराईमध्ये दरवाढ न दिल्याच्या कारणास्तव काम बंद केले होते. त्यामुळे भारतीय अन्न महामंडळाने दिलेल्या निर्देशानुसार औरंगाबाद गट नं. ५७ येथील गोदामातून अन्नधान्य उचल सुरु करण्यात आली. तथापि, तेथील हमाल कामगारांनीदेखील वराईमध्ये दरवाढ न दिल्याच्या कारणास्तव

काम बंद केल्याने अन्नधान्याची उचल कमी झाली आहे. नियमित गोदामांव्यतिरिक्त इतर गोदामांतून अन्नधान्याची उचल करावी लागत असून अतिरिक्त वाहतूकीमुळे अन्नधान्याची उचल शिल्लक आहे. तथापि, रास्तभाव दुकानदारांकडील शिल्लक अन्नधान्यातून पात्र लाभार्थ्यांना अन्नधान्याचे वितरण करण्यात आले असून माहे फेब्रुवारी, २०२२ मध्ये अंबड तालुक्यात ९२ टक्के अन्नधान्याचे वितरण करण्यात आले आहे. गव्हाच्या वितरणाबाबत नमूद करण्यात येते की, भरडधान्य वितरणाच्या धोरणानुसार अंबड तालुक्यात माहे एप्रिल, २०२२ मध्ये गहू व ज्वारीचे वितरण करण्यात आले असून माहे एप्रिल, २०२२ मध्ये ८५ टक्के अन्नधान्याचे वितरण करण्यात आले आहे. रास्तभाव दुकानदारांना अन्नधान्य उपलब्ध करुन देताना योग्य वजन करुनच अन्नधान्याची वाहने भरण्यात येतात. याबाबत संबंधित तहसीलदार यांचे प्रमाणपत्र घेण्यात येते. तसेच विहीत परिमाणात अन्नधान्य उपलब्ध झाल्याबाबत पोचपावतीवर संबंधित दुकानदारांची स्वाक्षरी घेण्यात येते.

माहे जून, २०२२ च्या अन्नधान्याचे वितरण ३० जून, २०२२ अखेर पूर्ण न झाल्याने जालना जिल्ह्यासह सर्व संबंधित जिल्ह्यांकरिता सदर अन्नधान्याच्या वितरणाची मुदत इ-पॉस मशिनवर दि.३०.७.२०२२ पर्यंत वाढविण्यात आली होती. सर्व पात्र लाभार्थ्यांना अन्नधान्य उपलब्ध होण्याच्या दृष्टीने माहे जून, २०२२ व जुलै, २०२२ या दोन्ही महिन्याचे धान्य उपलब्ध होण्यासाठी इ-पॉस मशिनवर सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. सदर अन्नधान्य वितरणाबाबत लाभार्थ्यांकडून कोणत्याही तक्रारी प्राप्त झालेल्या नाहीत.

अन्नधान्याची विहीत कालावधीत उचल करताना येणाऱ्या अडचणींचे निराकरण करण्याकरिता भारतीय अन्न महामंडळाशी वेळोवेळी पत्रव्यवहार करण्यात येतो. संबंधित वाहतूक कंत्राटदार यांनादेखील अन्नधान्याची उचल विहीत कालावधीत करण्याच्या सूचना वारंवार देण्यात आल्या आहेत. भारतीय अन्न महामंडळाच्या गोदामांतील हमाल कामगारांनी अचानक काम बंद करणे, त्यामुळे नियमित गोदामांव्यतिरिक्त जिल्हाबाह्य गोदामांतून अन्नधान्याची उचल करावी लागणे, सीएमआर तांदुळ कमी उपलब्ध होणे इत्यादी कारणास्तव अन्नधान्याची वाहतूक विहीत कालावधीत न झाल्यास केंद्र शासनाकडून अन्नधान्याच्या उचलीस मुदतवाढ घेण्यात येते. त्याच प्रमाणे विहीत कालावधीत अन्नधान्याचे वितरण न झाल्यास अन्नधान्य वितरणाकरिता देखील ई-पॉस मशीनवर मुदतवाढ देण्यात येते. कोणताही पात्र लाभार्थी अन्नधान्याच्या लाभापासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घेण्यात येते.

ई-पॉस मशीनद्वारे अन्नधान्याचे वितरण सुरळीत होण्याच्या दृष्टीने रास्तभाव दुकानांमध्ये नवीन ई-पॉस उपकरणे उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. नवीन उपकरणे ही ४G सेवा व बुबुळ पडताळणी (Iris Scanner) तंत्रज्ञान युक्त असतील. सदर ई-पॉस उपकरणांसाठी निविदा प्रसिद्ध करण्यात आली असून त्यानुसार लवकरच नवीन ई-पॉस उपकरणे रास्तभाव दुकानांना उपलब्ध करुन देण्यात येतील.

****

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२२ चे ~~द्वितीय~~ तृतीय (पावसाळी) अधिवेशन
महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना

श्री. राजेश एकडे, श्री. सहसराम कोरोटे, श्रीमती सुलभा खोडके, श्री. कैलास गोरंट्याल, श्री. शिरीष चौधरी, श्री. अमित झनक, ॲड. यशोमती ठाकूर, श्री. विजय थोरात, श्रीमती प्रतिभा धानोरकर, श्री. नानाभाऊ पटोले, श्री. कुनाल पाटील, श्री. विजय वडेट्टीवार, श्री. बळवंत वानखेडे, श्री. विक्रमसिंह सावंत, श्री. मोहनराव हंबर्डे, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सुचना पुढील प्रमाणे आहे:-

"मलकापूर जिल्हा बुलढाणा येथील " दि मलकापूर अर्बन बँकेच्या राज्यभरात सुमारे २८ शाखा असून सुमारे एक हजार कोटींच्या वर ठेवी असताना संचालक मंडळाच्या अपरातफरीबाबत शासनास प्राप्त तक्रारी व लोकप्रतिनिधी या नात्याने मी तत्कालीन उपमुख्यमंत्री यांचेकडे केलेल्या पाठपुराव्यामुळे दिनांक २७ नोव्हेंबर २०२१ पासून रिझर्व बँकेने मलकापूर अर्बन बँकेवर निर्बंध लावलेले असणे, सुरुवातीला हे निर्बंध सहा महिन्यासाठी असताना त्यास आणखी तीन महिन्यांची मुदतवाढ देण्यात येऊन रूपये पाच लक्ष पर्यंत ठेवी असलेल्या ठेवीदारांना आरबीआयच्या निर्देशाप्रमाणे संरक्षित करण्यात आल्यामुळे त्या ठेवीदारांच्या ठेवी बँकेद्वारे परत करण्यात येत असणे, तथापि रुपये पाच लक्षच्या वर ठेवीदारांना मात्र निराशा पदरी पडल्याने प्रचंड आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत असणे, संचालक मंडळाच्या अंदाधुंद कारभाराबद्दल यापूर्वी देखील पुराव्यासह सविस्तर तक्रार दाखल केलेली असणे, ज्यामध्ये विशेषत: बँकेचे तत्कालीन संचालकाचे मोठे बंधू यांचे निधन सन २०१० मध्ये झाल्यानंतर देखील सन २०१३ पर्यंत त्यांची पावर ऑफ ॲटर्नी हेतू पुरस्सर वापरण्यात येऊन जवळच्या व नात्यातील लोकांना क्षमतेपेक्षा जास्त कर्ज वाटप करण्यात आलेले असणे, सन २०१९ मध्ये बँकेला ऑडिट मध्ये "ड" वर्ग मिळालेला असणे, तसेच बँकेची आर्थिक परिस्थिती प्रचंड खालावल्यामुळे मागील तीन वर्षांपासून भागधारकांना लाभांश देखील देण्यात आलेला नसणे, सहकार आयुक्त व निबंधक कार्यालयाच्या मार्गदर्शक सूचनांना डावलून स्वत:च्या मुलाला अध्यक्षपदी विराजमान करणे तसेच बँक डबघाईला जाताच त्याचा राजीनाम न घेताच पुन्हा स्वत: अध्यक्षपदी विराजमान होणे, जवळच्या व नात्यातील लोकांना क्षमतेपेक्षा जास्त कर्ज वाटप करणे, संस्थेतील कर्मचाऱ्यांच्या नावावर भरमसाठ कर्जाची उचल करणे, म्हाडा व शक्ती दूध प्रकरणांत सर्वसामान्य अर्जदारांच्या नावे परस्पर कर्ज उचलणे हे व असे अनेक गंभीर स्वरूपाचे आरोप पुराव्यासह तक्रारीमध्ये करण्यात आलेले असल्याने तत्काळ संचालक मंडळ बरखास्त करण्याची आवश्यकता आणि लाखो ठेवीदारांना त्यांच्या कष्टाचा व हक्काचा पैसा त्वरित मिळवून देण्यासंबंधी शासनाने उचलावयाची पावले व करावयाची कार्यवाही."

मा. मंत्री (सहकार) यांचे निवेदन-

दि मलकापूर अर्बन को-बँक लि. मलकापूर, जि. बुलडाणा ही बँक महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० अन्वये नोंदणीकृत बँक असून सदर बँकेची नोंदणी २१.०४.१९६२ रोजी झालेली आहे. सदर बँकेचे कार्यक्षेत्र महाराष्ट्र राज्य असून राज्यात एकूण २८ शाखा आहेत.

बँकेमधील आर्थिक अनियमिततेमुळे रिझर्व्ह बँकेने सदर बँकेवर दि. २४.११.२०२१ रोजी (All Inclusive Directions) निर्बंध लादले. त्यानुसार बँकेस नविन कर्ज वाटप करण्यास तसेच नविन ठेवी स्विकारण्यास मनाई करण्यात आली. तसेच कर्मचाऱ्यांचे वेतन, वीजबिले, भाडे, स्टेशनरी इ. आवश्यक खर्च वगळता इतर खर्चासाठी रिझर्व्ह बँकेची परवानगी घेण्याचे निर्देश दिले. सदर निर्बंधाच्या दि. २४.

रिझर्व्ह बँकेने दि मलकापूर अर्बन को-बँक लि. या बँकेवर निर्बंध लादले त्या तारखेस बँकेमध्ये रु. ५ लाखाखालील ९०,९२६ ठेवीदारांच्या एकूण रु. ३३०.२२ कोटी इतक्या रक्कमेच्या ठेवी होत्या व रु. ५ लाखावरील ४,४६३ ठेवीदारांच्या एकूण रु. ९०५.८८ कोटी इतक्या रक्कमेच्या ठेवी होत्या. अशा एकूण ९५,३८९ ठेवीदारांच्या रु. १२३६.१० कोटी इतक्या रक्कमेच्या ठेवी होत्या.

बँकेला DICGC कडून प्राप्त झालेल्या क्लेम रक्कमामधून रु. ५ लाखापर्यंत ठेवी असणाऱ्या ६८,४८५ ठेवीदारांना रु. ४७८.१६ कोटी इतक्या रक्कमेच्या ठेवी आतापर्यंत अदा करण्यात आल्या आहेत. उर्वरीत ठेवीदारांच्या ठेवी वाटपाची कार्यवाही सुरु आहे.

मा. श्री. राजेश एकडे, वि.स.स. यांनी तत्कालीन मा. मंत्री (सहकार) यांचेकडे दि. १६.०७.२०२० रोजी दि मलकापूर अर्बन को-बँक लि. या बँकेसंदर्भात खालील मुद्यांबाबत तक्रार दाखल केली आहे. त्यापैकी महत्वाचे मुद्दे खालीलप्रमाणे आहेत-

१. सन २०१० मध्ये श्री. शक्तीभाऊ संचेती मयत असतानादेखील श्री. चैनसुख संचेती यांनी मुखत्यार म्हणून स्व. शक्तीभाऊ संचेती यांचे चिरंजीव अजयकुमार संचेती यांचे कर्ज प्रकरणाची कर्जमर्यादा नियमबाह्य वाढवून दिली.

२. सन २०१६ मध्ये बँकेच्या अध्यक्षपदी श्री. चैनसुख संचेती यांनी त्यांचे चिरंजीव श्री. राहुल चैनसुख संचेती यांची वर्णी लावल्यानंतर बँकेची आर्थिक स्थिती इतकी खालावली की, मागील तीन वर्षापासून भागधारकांना लाभांश देण्यात आला नाही.

सदर तक्रारीस अनुसरुन सहकार आयुक्त यांनी दिलेल्या निर्देशानुसार जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बुलडाणा यांनी जिल्हा विशेष लेखापरिक्षक, सहकारी संस्था, बुलडाणा यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती केली.

चौकशी अधिकारी यांनी सादर केलेल्या अहवालानुसार, श्री. अजयकुमार संचेती यांचे सदर बँकेत रु. ३.५ कोटी इतक्या रक्कमेचे कॅश क्रेडीट रिअल इस्टेट खाते सन २००६ पासून आहे. सदर कर्ज खात्यासठी कर्जदाराने त्यांच्या सामाईक मालकीची मालमत्ता गहाण ठेवली होती. मात्र सदर मालमत्ता सामाईक असल्याने कर्जदाराचे वडील श्री. शक्तीकुमार संचेती व मालमत्तेच्या इतर सहमालकांनी कर्जदारास व्यवहार करणे सुलभ व्हावे म्हणून त्याच्या नावे कुलमुखत्यार पत्र करुन दिले होते. सन २००९ मध्ये सदर खात्याच्या कर्जमर्यादा नुतनीकरणाच्या वेळी त्यांचे वडील श्री. शक्तीकुमार संचेती जिवंत होते. सन २०१० मध्ये श्री. शक्तीकुमार संचेती मयत झाले. त्यानंतर सन २०१२ मध्ये सदर खात्याच्या कर्जमर्यादा नुतनीकरणाच्यावेळी कुलमुखत्यारपत्र करुन देणाऱ्यापैकी एक व्यक्ती मयत झाली ही बाब अनावधानाने बँकेकडून दुर्लक्षीत झाली. सदर कर्जखाते दि. २९.०५.२०१७ रोजी निरंक झाले आहे. या प्रकरणात कर्जदाराला कोणतीही सुट दिल्याचे अथवा बँकेचे कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आले नाही.

श्री. राहुल चैनसुख संचेती यांची दि. २७.०५.२०१६ रोजी सदर बँकेच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. बँकेने सन २०१६-१७ या आर्थिक वर्षामध्ये सभासदांना ८% लाभांश दिला आहे. तथापि सन २०१७-१८ व सन २०१८-१९ या वर्षात अधिनियमातील तरतूदीनुसार आवश्यक त्या तरतूदी केल्यानंतर लाभांश वाटण्याकरीता नफा शिल्लक नसल्याने भागधारकांना लाभांश वाटप करण्यात आला नाही. तद्नंतर श्री. राहुल चैनसुख संचेती यांनी दि. २१.०३.२०२० रोजी अध्यक्षपदाचा राजीनामा दिल्यानंतर श्री. चैनसुख संचेती यांची दि. ०९.०४.२०२० रोजी सदर बँकेच्या अध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली.

मा. श्री. राजेश एकडे, वि.स.स. यांनी मा. मंत्री (सहकार) यांना सादर केलेल्या निवेदनामधील इतर मुद्यांच्या अनुषंगाने तात्काळ चौकशी करुन अहवाल सादर करणेबाबत सहकार आयुक्त यांचेकडून जिल्हा विशेष लेखापरिक्षक, सहकारी संस्था, बुलडाणा यांना निर्देश देण्यात आले आहेत.

राज्य उत्पादन शुल्क विभाग

लक्षवेधी सूचना ५५.

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२२ चे तृतीय (पावसाळी) अधिवेशन

श्री.अभिमन्यु पवार, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

"महाराष्ट्र दारुबंदी कायदा ची प्रभावीपणे अंमलबजावणी तसेच दोषसिध्दीचे प्रमाणामध्ये सुधारणा करण्यासाठी वेळोवेळी शासनाकडून कार्यवाही होत आलेली असणे, परंतु महाराष्ट्र दारूबंदी कायद्याचा विचार करता दरवर्षी महाराष्ट्रामध्ये सरासरी १ लक्ष गुन्हे दाखल होत असून फक्त नागपूर परिक्षेत्राचा विचार करता सरासरी २४,००० गुन्हे दाखल होत असून या कायद्यामध्ये दोषसिद्धीचे प्रमाण लक्षात घेता १% पेक्षा कमी असणे, महाराष्ट्र दारुबंदी कायद्याखाली दाखल झालेल्या प्रत्येक सौम्य / गंभीर गुन्हयामध्ये एफ.आय.आर., पंचनामा, मुद्देमाल जप्ती, FSL रिपोर्ट प्राप्त करणे व गुन्हयांचे सविस्तर तपास करुन न्यायालयामध्ये दोषारोप घटनास्थळ पत्र सादर करावे लागत असणे, त्याचबरोबर न्यायालयाकडुन प्रत्येक गुन्हयाचा निपटारा करण्यात येत असणे, गुन्हा दाखल झाल्यानंतर तपास करण्याकरीता काही दिवस ते काही महिन्याचा कालावधी लागत असणे, न्यायालयामध्ये सदर गुन्हयाची केस चालविण्यासाठी काही महिन्याचा कालावधी लागत असणे, त्याचबरोबर केसची न्यायालयीन सुनावणी होवुन निकाल लागेपावेतो काही महिन्याचा कालावधी लागणे, यासंपुर्ण प्रकिये दरम्यान जप्त केलेला मुद्देमाल पोलीस स्टेशनमध्ये जमा असणे, या प्रकियाकरीता बराच कालावधी जात असुन सुध्दा विविध कारणास्तव गुन्हे शाबीतीचे प्रमाण ०.५% याप्रमाणे अल्प असणे, यावरुन प्रचलीत कार्यपध्दतीद्वारे करण्यात येणारी कार्यवाही प्रभावी ठरत नसल्याचे दिसुन येत असणे, या कायद्याची परिणामकारक अंमलबजावणी करण्यामध्ये अपराध हे कोणतीही जोखीम न पत्करता उच्च लाभ मिळविण्याचे झालेले असल्याने अडचणी निर्माण होत असणे, त्याचप्रमाणे मोठ्या संख्येमध्ये दाखल होणाऱ्या दारुबंदी गुन्हयामुळे गंभीर गुन्हयाचा तपासाच्या व अभियोग चालविण्याच्या गुणवत्तेवर परिणाम होत असणे, महाराष्ट्र दारुबंदी कायदा हा एक सामाजिक कायदा असुन जेव्हा संघटीत गुन्हेगारी टोळया करुन मोठ्या प्रमाणात दारुची निर्मीती, विक्री, वाहतुक व तस्करी संघटीतरित्या केली जाते, तेव्हा त्यांचेविरुध्द कटोरपणे कार्यवाही करणे गरजेचे असणे, त्याचबरोबर अशा गुन्हयाचे गांभिर्यपुर्वक व गुणात्मक तपास करुन गुन्हेगाराना कडक शिक्षा होणे आवश्यक असणे, तथा लहान गुन्हयाकरीता एफ.आय.आर. दाखल करणे, तपास करणे, दोषारोपपत्र न्यायालयात पाठविणे व खटला चालविणे याकरीता लागणारे मनुष्यबळ कमी करुन गुन्हे शाबीतीचे प्रमाण कमीतकमी ६०% ते ८०% नी वाढविणे, शिक्षेच्या सुनिश्चीतीची खात्री करणे, लोकांना दारूबंदी कायद्याचे तरतुदीचे उल्लंघन करण्यापासून थांबविण्यासासाठी महाराष्ट्र दारुबंदी कायद्यात सुधारणा करणे आवश्यक असणे, दारुबंदी कायदयाखालील अपराध हे केवळ कमी जोखीमेचे व उच्च लाभ मिळविण्याकरीता न राहता कोणतेही जोखिम न पत्करता फक्त लाभ मिळविण्याचे झालेले असणे, ज्यामुळे, गुन्हेगारांमध्ये शिक्षा होण्याचा धाक नाहीसा झाल्याने दिवसेंदिवस त्यांचे धाडस वाढत असणे, त्यामुळेच, दारूबंदी कायद्यामधील तरतूदींचे योग्य आणि प्रभावी अंमलबजावणीसाठी शिक्षेच्या सुनिश्चीततेची खात्र करणे आणि या कायद्याचे तरतूदींमध्ये सुधारणा करणे सद्यस्थितीचा विचार करता अधिक महत्वाचे झालेले असणे, दारुबंदी कायद्याची परिणामकारक अंमलबजावणी करून दारूबंदी कायद्याखाली दाखल गुन्ह्यांत अभियोगांच्या प्रक्रियेमध्ये सुलभता आणणे, गंभीर / गुणात्मक आणि किरकोळ/लहान प्रकरणामध्ये भेद करणे तसेच किरकोळ /लहान प्रकरणाकरीता अभियोगाची क्रियारिती सुकर करणे, उपलब्ध माहीतीचे आधारावर विश्लेषण करुन पोलीस, अभियोजन पक्ष व न्यायालय या संस्थेवरील कामाचा भार कमी करणे या आणि इतर सुधारणा करणे गरजेचे असणे, तसेच सामाजिक दृष्या विचार करता राज्यातील प्रत्येक गावातील अनेक कुटुंब दारूच्या वाढते प्रमाण व गैर प्रसार यामुळे उधवस्त झाली असून गावातील महिलांचा दारू

दारुबंदी कायदा-१९४९ ची प्रभावीपणे अंमलबजावणी होण्यासाठी कायद्यात सुधारणा करण्याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

मा.मंत्री (राज्य उत्पादन शुल्क) यांचे निवेदन.

महाराष्ट्र दारुबंदी कायदा, १९४९ ची अंमलबजावणी दि.१६ जून, १९४९ पासून सुरू झाली आहे. या कायद्यान्वये अवैध मद्य निर्मिती, विक्री, वाहतूक, बाळगणे इ. अपराध करणाऱ्या इसमांविरुध्द कारवाई करण्याचे अधिकार दिलेले आहेत. तसेच या कायद्यान्वये असे अपराध करणाऱ्या इसमांना द्रव्य दंड किंवा कैदेची शिक्षा किंवा दोन्ही शिक्षा देण्याचे अधिकार मा. न्यायालयास आहेत. राज्य उत्पादन शुल्क विभागातील निरीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्यांना महाराष्ट्र दारुबंदी कायद्यांर्तगत गुन्हा नोंद करण्याचे व तपास करण्याचे अधिकार शासनाने दि.२१ मे, १९७४ च्या पत्रान्वये व दुय्यम निरीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्यांना शासन अधिसूचना दि.१६.१.१९९१ अन्वये देण्यात आलेले आहेत. पोलीस विभागातील अधिकाऱ्यांना या कायद्यांर्तगत गुन्हे नोंदविण्याचे अधिकार या कायद्याची अंमलबजावणी सूरु झाल्यापासून आहेत.

२. राज्य उत्पादन शुल्क विभागाने सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात नोंदविलेल्या गुन्ह्यांची विगतवारी खालीलप्रमाणे आहे.

वर्ष	एकूण गुन्हे	वारस	बेवारस	अटक आरोपी	मुद्देमालाची किंमत (रु. लाखात)
२०१७-१८	४५३३२	२६१४८	१९१८४	२६७६१	९०६२.९२
२०१८-१९	४४०८२	३०७०८	१३३७४	३०९६०	९४०४.४०
२०१९-२०	४६६४८	३२६३०	१४०१८	३३०५५	११५०७.६०
२०२०-२१	४५८६७	२९४५३	१६४१४	२९३९२	१०८९४
२०२१-२२	४७७४९	३४५४२	१३२०७	३५०५४	१४४४२
२०२२-२३ (एप्रिल-२२ ते जुलै-२२)	१५८८१	१२०५९	३८२२	१२०८६	५२५७

३. राज्य उत्पादन शुल्क विभागातील अधिकाऱ्यांनी सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात एकूण ४७,७४९ गुन्हे नोंदविलेले आहेत. यापैकी ३४,५४२ वारस (ज्यामध्ये आरोपी निष्पन्न झाले आहेत) गुन्ह्यांमध्ये ३५,०५४ आरोपींना अटक केली असून रु.१४४.४२ कोटी इतक्या रक्कमेचा मुद्देमाल जप्त केलेला आहे. या विभागात दोषसिध्दीचे प्रमाण १% पेक्षा कमी आहे.

४. राज्य उत्पादन शुल्क विभागामार्फत प्रामुख्याने महाराष्ट्र दारुबंदी कायदा, १९४९ अंतर्गत गुन्हे नोंदविलेले जातात. नोंदविलेल्या एकूण गुन्ह्यांपैकी बहुतांश गुन्हे या कायद्याच्या कलम ६५ अन्वये नोंदविलेले असतात. महाराष्ट्र दारुबंदी कायद्यातील कलम ६५ अन्वये बेकायदेशीरपणे मद्याची आयात, निर्यात, वाहतूक, खरेदी-विक्री, डिस्टीलरी / ब्रुवरीची उभारणी करणे, मद्य तयार करणे इ. प्रकारचे अपराध करणा-या इसमास दोषसिध्दी नंतर मा. न्यायालय किमान ३ वर्ष ते ५ वर्षापर्यत कैदेची शिक्षा किंवा किमान रु.२५,०००/- ते रु.५०,०००/- पर्यत द्रव्य दंड किंवा दोन्ही शिक्षा देऊ शकते अशी तरतुद आहे. सदरची शिक्षा जप्त करण्यात आलेल्या मळी/ मद्य / मद्यार्काच्या परिमाणावर अवलंबून नाही.

अ) अवैध दारु विक्री, निर्मिती व इतर संलग्न बाबी संदर्भात करावयाच्या कार्यवाहीबाबत सविस्तर सुचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. त्यामध्ये पोलीस व राज्य उत्पाद्न शुल्क विभागाने एकत्रित कार्यवाहीच्या सूचना दिलेल्या आहेत. दरमहा बैठक घेऊन माहितीचे आदान प्रदान करावे तसेच ३ पेक्षा जास्त वेळेस कारवाई झालेल्या इसमाविरुध्द एम.पी.डी.ए. १९८१ अन्वये कारवाई कालबध्द स्वरुपात होईल याकडे पोलीस घटक प्रमुखाने विशेषत्वाने लक्ष देण्याचे व इतर निर्देश दिले आहेत. तसेच ग्रामरक्षक दलाने केलेल्या तक्रारीची तातडीने दखल घेण्यात यावी व तसे न केल्याचे आढळल्यास आणि त्या ठिकाणी अवैध दारू धंदे सूरु असल्याचे आढळल्यास संबंधित अधिकाऱ्यावर कर्तव्यात कसूर केल्याबाबत शिस्तंभग विषयक कारवाई करण्याच्या सूचना शासन परिपत्रक दि.१ मार्च, २०१७ अन्वये दिलेल्या आहेत.

आ) जनतेला अवैध मद्य निर्मिती व विक्री बाबत तक्रार करण्यासाठी वॉट्सॲप क्रमांक ८४२२००११३३ व टोल फ्री क्र. १८०० २३३ ९९९९ उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क कार्यालयात नियंत्रण कक्ष स्थापित केलेला आहे. तो २४X७ कार्यरत असतो.

इ) राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून दाखल करण्यात येणाऱ्या गुन्ह्यांच्या संदर्भातील दोषारोपपत्र व त्याची गुणात्मकता वाढविण्यासाठी वैधानिक सहाय्य मिळावे यासाठी कंत्राटी पध्दतीने विधि अधिकारी/ विधि सल्लागार प्रत्येक जिल्ह्यात भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

ई) महाराष्ट्र दारुबंदी कायदा, १९४९ मधील कलम ९३ अन्वये सराईत गुन्हेगारांविरुध्द प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात येते व त्यांच्याकडून चांगल्या वर्तणूकीचे बंधपत्र घेण्याचे अधिकार उपविभागीय दंडाधिकारी / सहाय्यक पोलीस आयुक्त यांना आहेत.

उ) गुन्हा अन्वेषणाची गुणात्मकता वाढविण्यासाठी कायद्यातील प्रचलित तरतूदी, कार्यपध्दती, तपासी अधिकारी यांनी घ्यावयाची आवश्यकता, दोषारोपपत्र बिनचूक सादर करण्याकरिता घ्यावयाची खबरदारी व अनुषंगिक बाबींसंदर्भात सविस्तर सूचना क्षेत्रिय अधिकारी यांना देण्यात आल्या आहेत.

ऊ) विभागीय स्तरावर कार्यशाळा घेऊन गुन्हा अन्वेषणाची कामगिरी उत्तम करण्यासाठी प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात येतात.

६. राज्य उत्पादन शुल्क विभाग हा राज्यास महसूल देणारा महत्त्वाचा विभाग आहे. विभागाकडून गुन्हा अन्वेषणासंदर्भात होणा-या कारवाईमुळे राज्याच्या महसूलाचे संवर्धन होत असते. यामुळे कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणी बरोबरच दोषसिध्दींचे प्रमाण वाढविण्यासाठी विभागातील मनुष्यबळाचे सक्षमीकरण करण्याबरोबरच अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करण्याचा विभागाचा प्रयत्न राहील.

****

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२२ चे ~~दुसरे~~ तृतीय (पावसाळी) अधिवेशन

लक्षवेधी सूचना क्र.

मा. श्री. अतुल भातखळकर, श्रीमती मेघना साकोरे-बोर्डीकर, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र. पुढील प्रमाणे आहे.

"नंदुरबार जिल्ह्यात गेल्या अडीच वर्षात साडेनऊ हजार बालविवाह झाल्याची धक्कादायक माहिती माहे ऑगस्ट २०२२ मध्ये निदर्शनास येणे, तसेच मुंबई, कांदिवली या शहरी भागातही बालविवाहाची घटना घडल्याचे निदर्शनास येणे, त्यामध्ये पैशाअभावी मुलींची लग्न लावून जबाबदारीतून सुटका करुन घेण्याकडे कल असल्याचे निदर्शनास येणे, त्यामध्ये बालविवाह रोखण्यासाठी राज्यात अनेक कठोर कायदे करण्यात आले असतानाही त्याची अंमलबजावणी मात्र होत नसल्याचे निदर्शनास येणे, त्यामुळे राज्यात बालविवाह रोखण्यासाठी जनजागृती करण्याची गरज असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

निवेदन

(श्री. मंगलप्रभात लोढा, मंत्री, महिला व बाल विकास विभाग)

आदिवासी भागातील कुपोषणाचे व बालमृत्यूचे प्रमाण कमी करण्यासंदर्भात मा. उच्च न्यायालयामध्ये जनहित याचिका १३३/२००७ दाखल करण्यात आली आहे. सदर जनहित याचिकेच्या सुनावणीमध्ये दि. १४/०३/२०२२ रोजी मा. उच्च न्यायालयाने बालमृत्यू होण्यामध्ये बालविवाह सुध्दा एक कारण असू शकते असा निष्कर्ष काढला आहे. त्या अनुषंगाने गेल्या ३ वर्षामध्ये आदिवासी भागात किती बालविवाह झाले त्याचे सर्वेक्षण करण्याबाबत निर्देश दिले आहेत. मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार आणि मा. ॲडव्होकेट जनरल आणि मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्या निदेशानुसार १६ आदिवासी जिल्ह्यातील बालविवाहाचे सर्वेक्षण करणेसाठी त्रिस्तरीय समिती नेमण्यात आली होती. सदरचे सर्वेक्षण अंगणवाडी सेविका व आशा वर्कर यांच्यामार्फत करुन घेण्यात आले होते. सर्वेक्षणाच्या प्राप्त अहवालानुसार जिल्ह्यांच्या सॅम (SAM), मॅम (MAM) व बालमृत्यू झालेल्या बालकांच्या मातांचे सर्वेक्षण करण्यात आले.

सर्वेक्षणानुसार नंदुरबार जिल्ह्यात ७१९६ बालविवाह झालेले आहेत. तसेच मुंबई उपनगर जिल्ह्यात माहे ऑगस्ट, २०२२ पर्यंत ३ बालविवाहाच्या घटना घडल्याबाबतच्या तक्रारी स्थानिक स्वयंसेवी संस्थांद्वारे प्राप्त झाल्या असून चाइल्ड लाईन / स्थानिक स्वयंसेवी संस्था/ जिल्हा बाल संरक्षण कक्ष यांच्याद्वारे हस्तक्षेप करण्यात आला असून बालविवाह रोखण्यात आले आहे. सदर तिनही तक्रारी मालाड, शिवाजीनगर आणि विक्रोळी (टागोर नगर) या कार्यक्षेत्रातील आहेत. तसेच बालविवाह प्रतिबंध कायद्याबाबत मुंबई उपनगर जिल्ह्यामार्फत जनजागृती कार्यक्रम स्थानिक स्वयंसेवी संस्था, बाल विकास प्रकल्प अधिकारी, संरक्षण अधिकारी यांच्यामार्फत स्थानिक वस्तीपातळीवर राबविण्यात येत आहे. तसेच प्रभागस्तरीय बाल संरक्षण समित्या यांच्यामार्फत देखील विविध कार्यक्रम घेण्यात येत आहेत. दि. १२ व १३ ऑगस्ट २०२२ रोजी आय. एल. एम. लॉ. कॉलेज, पुणे येथे बालविवाह विरुध्द राज्यस्तरीय

असूरक्षितता, काही समाजातील रुढीपरंपरा, मजूरी करण्याकरीता मजुरांची आवश्यकता इ. कारणांमुळे बालविवाह होत असल्याचे कार्यशाळेतील उपस्थितांनी मत व्यक्त केले.

राज्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीमधील ग्रामसेवकांची त्यांच्या ग्रामपंचायतीच्या क्षेत्रात बालविवाह प्रतिबंधक अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. संबंधित ग्रामपंचायत क्षेत्रात नियुक्त केलेल्या अंगणवाडी सेविकांना बालविवाह प्रतिबंधक अधिकाऱ्यास सहाय्य करण्याकरिता नियुक्त करण्यात आले आहे. नागरी भागासाठी बालविवाह प्रतिबंधक अधिकारी म्हणून बाल विकास प्रकल्प अधिकारी यांना नियुक्त करण्यात आले आहे. तसेच, त्यांना सहाय्य करण्याकरिता अंगणवाडी पर्यवेक्षिकांची नियुक्ती करण्यात आली आहे. प्रत्येक जिल्ह्यामध्ये जिल्हा बाल संरक्षण कक्षाची स्थापना करण्यात आली असून या कक्षामार्फत बालविवाहाचे निर्मुलन करण्यासाठी कार्यक्रमांचे आयोजन नियमितपणे करण्यात येते. जिल्हा बाल संरक्षण कक्ष, स्वयंसेवी संस्था आणि चाईल्ड लाईन यांच्या माध्यमातून बालविवाह रोखण्याबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच अधिनियमाची परिणामकारक अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने विविध शासकीय व निमशासकीय यंत्रणांशी समन्वय साधण्यात येत आहे.

राज्यातील सर्व ६ विभागीय पातळीवर युनिसेफ यांच्या सहकार्याने नागरी भागाकरिता घोषित करण्यात आलेल्या बालविवाह प्रतिबंधक अधिकारी यांचेकरिता माहे जानेवारी आणि फेब्रुवारी २०१९ मध्ये प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. ग्राम बालसंरक्षण समितीच्या सदस्यांना प्रशिक्षण देण्यासाठी तज्ञ मार्गदर्शक म्हणून जिल्हा बाल संरक्षण कक्षातील, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी, कार्यक्रम अधिकारी (संस्थात्मक), कार्यक्रम अधिकारी (संस्थाबाह्य), समाजसेवक यांना दिनांक १७ फेब्रुबारी २०२१ रोजी प्रशिक्षित करण्यात आले. तद्नंतर राज्यातील ३५२ तालुक्यातील प्रत्येकी १०० ग्राम बालसंरक्षण समितीच्या सदस्य सचिव अंगणवाडी सेविका आणि सदस्य पोलिस पाटील यांचे २ टप्प्यात तालुकास्तरीय प्रशिक्षण घेण्यात आले. या प्रशिक्षणामध्ये प्रामुख्याने बालविवाह या विषयावर भर देण्यात आला. सदर सदस्यांकडून ग्राम व नागरी पातळीवर जगजागृती करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

****